
# श्री साईलीला



डोकेदुखी बरी करण्याचा चमत्कार.



जानेवारी ६० पैसे १९७५

# अनुक्रमणिका – जानेवारी १९७५


| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय | भगवान महावीर |
| २. | संतकवी दासगणूमहाराज | श्री. साईनंद |
| ३. | साकोरी आणि माताजी | डॉ. के. भ. गव्हाणकर |
| ४. | संत फ्रॅंसिस झेवियर | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ५. | संगीत दिग्दर्शक साईभक्त–सी. रामचंद्र | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ६. | वाऱ्यावरचे विचार | श्री. द. शं. टिपणीस |
| ७. | ज्योतिषशास्त्राचा ओनामा | होराशंकर शं. वा. देवधर |
| ८. | नामस्मरणातून गुरुप्रसाद | श्री. प्रकाशभाई दोशी |
| ९. | साईभक्ताची स्वप्ने | श्री. माधवराव गोरे |
| १०. | श्रीसाईनाथ चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ११. | मानवी जीवनाचा रथ | श्री. बाळकृष्ण धामणकर |
| १२. | श्रीमती ताई खडके–श्रद्धांजली | — |
| १३. | देवा, पांडुरंग पांडुरंग | श्री. विजय हजारे |
| १४. | श्रीसाई स्वप्न | श्री. श्रीराम आठवले |
| १५. | नामाची शिदोरी | श्री. विनायक पाठक |
| १६. | चिदानंद हे साई | श्री. रा. मा. आडकर |
| १७. | भूवरी आले साईनाथ | सौ. सुशीला हजारे |
| १८. | आता इच्छित मनोरथ पुरवावे | सौ. कलावती चव्हाण |
| २०. | शिर्डीवृत्त | — |

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्री साईवाक्सुधा

महात्मा हो कां पापात्मा । जीवात्मा तोच परमात्मा ।
हें जाणूनि वर्तेल तो महात्मा । अभेदात्मा तो एक ॥ १५१ ॥
ब्रह्मात्मैकत्व विज्ञान । हेंच ज्ञानाचें पर्यवसान ।
झालिया एकदां आत्मज्ञान । समस्त अज्ञान मावळे ॥ १५२ ॥
आत्मज्ञान होतां पुरें । अवगंतव्य मग कांहीं नुरे ।
करतलगत वस्तुजात सारें । साक्षात्कारें तयासी ॥ १५३ ॥
आत्मविज्ञानाचें फळ । संसार निवृत्ति अविकळ ।
परमानंद प्राप्ति तात्काळ । तया सुकाळ मोक्षाचा ॥ १५४ ॥
आत्मा सूक्ष्माहून सूक्ष्मतर । महताहूनि महत्तर ।
हा तों सर्व व्यापका प्रकार । बुद्धिगोचर करावया ॥ १५५ ॥

श्रीसाईसच्चरित – अध्याय १६ वा

---


## श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] जानेवारी १९७५ [ अंक १०

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम्. ए. पी. एच्‌डी., रा. भा. प्रवीण
- श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्सी., एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. ०–६० फक्त.

*

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.
पीन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

संपादकीय –

# भगवान महावीर

वंदनीय भगवान महावीर यांची २५००वी जयंती अखिल भारतात सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरी होत आहे. भगवान महावीर हे जैनांचे चोवीसावे तीर्थंकर होत. यापूर्वी तेवीसावे तीर्थंकर जे होते त्याचे नाव पार्श्वनाथ.

या पृथ्वीतलावर मानवतेच्या कल्याणाकरिता वेळोवेळी महान विभूति जन्म घेत असतात. आपल्या कर्तृत्वशाली आदर्श जीवनाने आणि आपल्या सामर्थ्य प्रभावाने त्या विभूती मानवाची दुःखे हरण करण्याकरिता पराकाष्ठेचा प्रयत्न करतात आणि आपली थोर सेवा आणि मार्गदर्शन पुढील पिढीस आदर्श ठेवून अखेरीस ब्रह्मीभूत होतात. भगवान महावीर सुद्धा एक अशीच थोर महान विभूती या भूतलावर अवतीर्ण झाली होती. या महावीरांच्या जीवनाची किंवा त्यांच्या जीवनाशी संबंधीत असलेल्या घटनांची क्रमबद्ध अशी माहिती आज उपलब्ध नसली तरी जैन अनुश्रुति आणि धार्मिक साहित्य यांच्या आधारे ते एक युगप्रवर्तक महापुरुष होऊन गेले यात वाद नाही. त्यांनी आपल्या कार्याने सत्य आणि अहिंसेचा कल्याणप्रद मार्ग जगतापुढे ठेवला.

बुद्धदेवाच्या जन्माच्या काही वर्षापूर्वी म्हणजे आजपासून जवळ जवळ अडीच हजार वर्षापूर्वी मगध देशात ज्ञातृक कुलातील शाखेत जैनांचे अंतीम अवतार श्रीमहावीर यांचा जन्म चैत्र शुक्ल त्रयोदशीस झाला. त्यांच्या पिताजीचे नाव सिद्धार्थ. ते वैशाली जवळच असलेल्या कुंड नामक गावचे राजे होते. महावीरांच्या मातेचे नाव त्रिशला लिच्छवी. ती राजे चेटक याची बहीण. महावीरांचे खरेखुरे नाव वर्धमान असे जरी असले तरी वीर, अतिवीर, महावीर, सन्मति इत्यादी नावानी त्यांचा उल्लेख अनेक प्राचीन साहित्यात मिळतो. त्यांच्या अप्सरेसारख्या सुंदर पत्नीचे नाव होते यशोदा.

बाल्यावस्थेपासूनच महावीर गंभीर प्रकृतीचे होते. वैराग्य व तप याकडे ओढ असल्यामुळे की काय सांसारिक सुखदुःखापासून ते सर्वस्वी अलिप्त होते. त्यांच्या जीवनाचे तीन विभाग पाडले जातात. त्यांच्या जीवनाचा पहिला भाग आदर्श गृहस्थ जीवनाचे आणि दुसरा भाग ज्ञानी–ध्यानी व साधने कर्मांचे दर्शन घडवितो तर तिसऱ्या अंतीम भागात ते त्रिलोक पूज्य अवतार म्हणून चमकलेले दृष्टीस पडतात. वयाच्या अवध्या तिसाव्या वर्षीच ते संसारातून विरक्त झाले. ज्ञानप्राप्तीचा एकच ध्यास त्यांना लागला व त्या प्रित्यर्थ संपत्तीदान व राज्यत्याग करून केवळ एक वस्त्रानिशी त्यांनी गृहत्यागही केला व तप करण्याकरिता ते निघून गेले.

बरोबर बारा वर्षे उग्र तपश्चर्या केल्यावर त्यांनी मोह–माया आदींवर संपूर्णतः विजय मिळविला व जृंभिक गावातील ऋजुकूला नदी किनारी वैशाख शु. दशमीस तिसऱ्या प्रहरी त्यांना पूर्ण व शुद्ध ज्ञानाची प्राप्ती झाली. त्यांच्या हृदयमंदिराचे कपाट उघडले गेले व त्यातून ज्ञानप्रवाह वाहू लागला.

ज्ञानप्राप्ती पश्चात आपले अनुभव जनतेस कथन करण्याकरिता त्यांनी अनेक ठिकाणी संचार केला परंतु योग्य शिष्याभावी त्यांचे उद्दिष्ट पुरे झाले नाही. त्यांच्या साधनाकालास जैन ग्रंथात "छद्मस्थ अवस्था" असे म्हटलेले आढळते. या अवस्थेत उपदेश व मार्गदर्शन करण्याकरिता व त्यासाठी योग्य ती संधि मिळविण्याकरिता ते अगदी मौन होते. अपरिपक्व अवस्थेत दिला गेलेला ज्ञानोपदेश अपूर्ण दिसतो व तो योग्य मार्गदर्शन करू शकत नाही असा त्यांचा दृढ विश्वास होता. ६६ दिवस ते मौन धरून होते. शेवटी आषाढ शुक्र पौर्णिमेस चारी वेद पारंगत गौतम गोत्रीय ब्राह्मण इंद्रभूति काही शंकांचे समाधान करून घेण्यासाठी त्यांचेकडे आले व तेच त्यांचे शिष्य बनले. त्यांच्या विद्वत्तेने संतुष्ट होऊनच की काय महावीरांनी त्यांना आपल्या संघाचे नायकत्व बहाल केले. अशाप्रकारे इंद्रभूतीना गुरु व महावीरांना शिष्य यांची प्राप्ती झाली.

शिष्यप्राप्ती होताच त्यांनी श्रावण या वर्षाऋतूच्या पहिल्या महिन्यातील कृष्णपक्षाचे प्रतिपदेस अभिजित नक्षत्राच्या उदयकालात राग, द्वेष, भय इत्यादींची मुळीच तमा न बाळगता पंचशैलपूर येथील पूज्य नि सुरम्य अशा विपुलाचल पर्वतावर अगदी पहिले धार्मिक व्याख्यान दिले. "उप्पणे वा विगमे वा धुवे वा" हे त्यांच्या मुखातून निघालेले अगदी पहिले वाक्य व त्यांचा सर्वप्रथम उपदेश "अहिंसा" हा होता. त्यांच्या त्या पहिल्या वाक्याचा अर्थ असा जगातील सर्व वस्तू जशा उत्पन्न होतात तशा त्या नष्टही होतात. पण केवळ आपल्या कर्तृत्वाने त्या अढळ राहू शकतील. त्यांनी आपल्या अहिंसेच्या उपदेशात सांगितले आहे की या जगात प्रत्येक जण जगू इच्छितो. सर्वांना आपला जीव प्यारा आहे. सर्वजण सुखी बनू इच्छितात व दुःखापासून अलिप्त राहू इच्छितात. अतएव कुणी कुणाला मुळीसुद्धा त्रास देऊ नये. त्यांच्या कथनाचे तात्पर्य त्यांच्याच भाषेत असे–जे एगं जाणइ से सव्वं जाणई से एगं जाणई" जो एकास ओळखतो तो सर्वांस ओळखतो व जो सर्वांना ओळखतो तो एकास ओळखतोच ओळखतो."

ज्ञानप्राप्तीच्या वेळी महावीरांचे वय बेचाळीस होते. त्यानंतर ते सुमारे तीस वर्षे भिन्नभिन्न देशात भ्रमण करीत व उपदेश देत होते. काशी, कौशल, पांचाल, कलिंग, कुरु, जांगल, कंबोज, बाल्हिक, सिंध, गांधार इ. देशातील लोकांनी त्यांचा सन्मान केला व त्यांच्या धार्मिक कथनाचा अंगीकार केला. मगधचा राजा बिंबिसार, त्याचा पुत्र अजातशत्रु, वत्सदेशाचा राजा उदयन हे मुकुटधारी राजे

त्यांचे शिष्य बनले. महावीरांची सुकीर्ती चोहोकडे वेगाने पसरली. आपल्या अमोल उपदेशातून त्यांनी अहिंसा ही धर्माची पहिली पायरी होय यावर भर तर दिलाच पण त्याशिवाय आवश्यकतेशिवाय अधिक वस्तूंचा संग्रह करणे व दुसऱ्यांच्या वस्तू हिरावून घेणे यामुळे लोभशक्ति वाढत जाते व त्यामुळे भांडवलशाही व साम्राज्यवाद या वृत्ति उद्दीपित होतात असे आपले मत प्रतिपादिले. महावीरांच्या उपदेश रुपाने आत्मविकासाच्या सर्वोच्च अवस्थेचे नाव ईश्वर होय. "जेव्हा मानव षड्रिपुतून मुक्त होतो तेव्हाच त्याला ईश्वराचे स्वरूप प्राप्त होते" असे कथन वेळोवेळी केले जाई. त्याच प्रमाणे ते म्हणत, "हे मानवा ! तुला जे काही पाहिजे ते तू करू शकतोस, आपल्या स्वेच्छेप्रमाणे तू बनू पण शकतोस. आपल्या भाग्याचा विधाता तूच आहेस. पुरुषार्थ-पूर्वक अंधश्रद्धेला सोडून देऊन तू आपला भावी मार्ग आक्रमण कर. इष्टसिद्धी तुला अवश्य प्राप्त होईल." असे उपदेशतत्व प्रतिपादले जाई.

अशाप्रकारे उपदेश व ज्ञानप्रसारात भगवान महावीरांनी तीस वर्षे घालविली. त्यांचे वय आता ७२ वर्षाचे झाले होते आणि मग कार्तिक कृष्ण चतुर्दशीच्या रात्री पावा नगरीजवळील कमल सरोवरानी सुशोभित अशा सरोवराच्या मध्ये एका उच्च आसनावर अधिष्ठित होऊन महावीरांनी निर्वाण केले. बिहारमधील पावापुरीस महावीर आले असताना त्यांची अमृतवाणी ऐकण्यास देशोदेशीचे राजे व हजारो लोक आले होते. परंतु तेथले महावीरांचे प्रवचन शेवटचेच ठरले. या ठिकाणी उपदेश देत असतानाच त्यांची प्राणज्योत मालविली गेली. जगातील एक थोर विभूती निघून गेली. तेजाचा प्रकाशपुंज नाहिसा झाला. महावीरांच्या शरीर त्यागाच्या वेळी साऱ्या साऱ्यांना दुःख झाले असले तरी त्यांचे निर्वाण हे अनन्यसाधारण पुरुषाचे निर्वाण म्हणूनच की काय त्यावेळी 'निर्वाण महोत्सव' करण्यात आला. याच निर्वाण महोत्सवाच्या रात्री महावीरांचा पट्टशिष्य गौतम यांना संपूर्ण ज्ञानप्राप्ती झाली व या निर्वाण महोत्सवाची महत्ता द्विगुणित झाली. भगवान महावीरांच्या निर्वाण कालापासून जैन धर्मातील शिष्यात वीर संवताची गणना करण्यास सुरुवात झाली. हा वीर संवत विक्रम संवताहून ४७० वर्षे जुना आहे.

भगवान महावीर आज अनंतात विलीन झाले असले तरी त्यांची नीतीतत्वे व उपदेश आपण सर्वांनी आचरणात आणायलाच हवीत इतकी ती आजच्या काळात आदर्श अशी आहेत.

### श्रीसाईबाबांच्या सहवासातील संत

# श्रीदासगणू महाराज

• श्री साईनंद

जन्म :

पौष शु. ११ शके १७८९
६-१-१८६८



पुण्यतिथी :

कार्तिकी व. १३ शके १८८४
(ज्ञानेश्वर पुण्यतिथी दिन)
२५-११-१९६२

**तेही प्राणा परौतें । आवडती हे निरुते ।**
**जे भक्त चरित्रातें । प्रशंसती ॥**

ज्ञानेश्वरी अ. १२-२२७

पौष शुद्ध एकादशी हा दिवस महाराष्ट्राचे थोर संत कवी श्रीदासगणू महाराज यांचा जन्म दिवस म्हणून ओळखला जातो. या तिथीला त्यांचा जन्म शके १७८९ म्हणजे ६ जानेवारी १८६८ रोजी झाला. त्यांचे संपूर्ण नाव गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे. ते ऋग्वेदी चित्तपावन ब्राह्मण. त्यांचे जन्मस्थळ अकोळनेर गाव. त्यांच्या आईचे नाव सावित्रीबाई. दासगणूंचे पाळण्यातील नाव नारायण, पण आजोबा एकनाथपंत यांनी या

तान्ह्या मुलाचे गुबगुबीत, गणपतीसारखे पोट व मोठे कान पाहून त्याचे नाव गणेश ठेवले व तेच पुढे अजरामर झाले.

नगर येथे वयाच्या नवव्या वर्षी दासगणूंची मुंज झाली. वडलांच्या विविध व्यवसायामुळे त्यांना आपल्या मुलाकडे लक्ष देण्यास फारशी सवडच झाली नाही. चुलते जनार्दनपंत मामलेदार होते, ते सारखे फिरतीवर असत म्हणून आपल्या पुतण्याला त्यांनी रघुनाथ बळवंत लिमये या अत्यंत कडक शिस्तीत असलेल्या गृहस्थांकडे केवळ शिक्षणासाठी म्हणून ठेवले. पण त्यांच्या कडक वागण्याचा छोट्या दासगणूंवर उलट परिणाम झाला. अभ्यासाच्या गोडी ऐवजी त्यांना अभ्यासाचा तिटकारा वाटू लागला. वयाच्या सोळाव्या वर्षी ते इंग्रजी तिसरीत होते. आपल्या शालेय जीवनात त्यांनी खूप उनाडक्या केल्या.

पुढे मामलेदार चुलत्यांनी तरुण दासगणूंना संगमनेरास ठकार नावाच्या एका पदवीधर शिक्षकाचे ताब्यात दिले. पण तिथेही त्यांचे अभ्यासात मन रमले नाही. तिथे गोंधळी आणि तमासगीर मंडळीशी त्यांची सलगी झाली. अनंतफंदी, प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ, होनाजी बाळा यांच्यासारख्या लावण्या व पोवाडे, फटके, छकडे आपण रचावेत असे त्यांच्या मनाने घेतले व अभ्यासाऐवजी ते याचीच रचना निर्मिती करण्यात गुंग होऊन गेले. इंग्रजी चौथीत त्यांनी शिक्षणाला कायमचा रामराम ठोकला. उद्योग-धंदा, नोकरी, शिक्षण यापैकी काही एक न करता चकाट्या पिटीत नगर शहरातून हिंडत फिरत ते वेळ घालवू लागले. ही गोष्ट घरातील मंडळींना आवडली नाही. त्यामुळे चुलत्याचे घरात त्यांचे वारंवार खटके उडू लागले. चुलती तर त्यांना टोचून बोलू लागली. म्हणून रागाने ते जे घरातून निघाले ते परत चुलत्याच्या घरात आले नाहीत. आपले एक मित्र श्री विश्वनाथपंत निसळ यांचे घरी ते येऊन राहिले. एकदा असेच ते नगरच्या रस्त्यातून हिंडत असताना पोलिस सुपरिटेंडेंट श्री. एम. केनेडी या युरोपियन गृहस्थांशी ह्यांची गाठ पडली. दासगणूंच्या बरोबर त्याची थोडीशी तोंड ओळख होती. या केनेडी-साहेबानेच दासगणूंना पोलिस खात्यात भरती होण्याची सल्लामसलत दिली व त्यानुसार दासगणू अवघ्या नऊ रुपये पगारावर शिपाई म्हणून नोकरीस राहिले. शरीराने त्यावेळी ते चांगले सशक्त व उंचे पुरे होते. पुढे नगर जिल्ह्यातच दासगणूंनी श्रीगोंदे, जामखेड, खर्डी, नगर, नेवासे इ. गावी एकूण अकरा वर्षे नोकरी केली.

आपला मुलगा पोलिसात भरती झाला ही गोष्ट दासगणूंच्या आईला काही बरी वाटली नाही. चुलत्यांनी तर त्यांचे मन बळविण्याचा खूप प्रयत्न केला, पण त्यात त्यांना यश आले नाही. आईने मुलाचे ग्रहमान पहाण्यासाठी ज्योतिषाला पत्रिका दाखविली. तेव्हा ज्योतिषाने मुलाचे ग्रहयोग फार चांगले आहेत, त्यामुळे हा मुलगा पुढे विद्वान, श्रीमंत व अधिकारी व्यक्तींनाही वंदनीय होईल, तो मोठा लौकिकवान होईल असे सांगितले. आपले आईचे ज्योतिषाकडे सारखे जाणे–येणे दासगणूंना आवडले नाही व त्यांनी आपले जन्मटिपण आगीत जाळून टाकले.

आयुष्याच्या पूर्वार्धात हिंडत-फिरत रहाणारे दासगणू नोकरीच्या काळात घडून आलेल्या स्थित्यंतरामुळे त्यांचा स्वभाव पार बदलला. दैवी शक्ती व त्याचा अधिकार त्यांना पदोपदी प्रत्यास येऊ लागला व अनेक संकटातून त्यांची मुक्तता झाली. कै. ह. भ. प. वामनशास्त्री इस्लामपूरकरांसारख्या अधिकारी व्यक्तिचा उपदेश त्यांना मिळाला व यांची वृत्ती स्थिर झाली. यांच्याचमुळे श्रीगणेश सहस्रबुद्धे हे 'दासगणू' म्हणून प्रसिद्धीस आले. प्रथम दासगणू कट्टर शिवभक्त होते. शंकराची सर्व व्रते ते कडक करीत. पुढे वामनशास्त्रींच्या उपदेशावरून ते पंढरपूरची वारी नियमित करू लागले. शास्त्री-बुवांच्या आज्ञेनुसार दासगणूंनी काही काळ शिर्डीस श्रीसाईबाबांच्या सहवासात काढला. पुढे गोदाकाठी असलेल्या नांदेड मुक्कामी त्यांचे शुभागमन झाले. दासगणूंना गोदामाते-बद्दल खूपच आकर्षण व त्यामुळेच 'गोदामहात्म्य' या ग्रंथाची निर्मिती त्यांनी केली.

श्री. वामनशास्त्री इस्लामपूरकर यांनी काशी येथे शके १८१८ च्या ज्येष्ठ वद्य एकादशीला विश्वेश्वरचरणी देह अर्पण केला. त्यापूर्वी काही दिवस त्यांची दासगणूंच्या बरोबर भेट झाली या भेटीत त्यांनी "शिर्डीचे श्रीसाईबाबा थोर विभूति आहेत, त्यांना तू माझेच स्वरूप मान. आम्ही दोघे एकरूप आहोत. तेच येथून पुढे तुला वेळोवेळी मार्ग दाखवतील" असे दासगणूंना सांगितले. त्यांचे कथन दासगणूंनी शिरसावंद्य मानले. त्यांची निष्ठा श्रीसाईबाबांच्या चरणी स्थिरावली व त्या निष्ठेतूनच 'शिर्डी माझे पंढरपूर, साईबाबा रमावर" अशा प्रकारचा सुंदर अभंग स्फुरला. श्री. नानासाहेब चांदोरकर यांच्या बरोबर १८९६ साली दासगणू प्रथम साईबाबांच्या दर्शनासाठी गेले होते. श्रीबाबांनी एक दिवस श्री. चांदोरकरांना सुचविले, "नाना, सगळ्या संत मंडळींना जेवावयास बोलीव. सगळी सिद्धता चांगली कर व आपल्या या गणूवर सर्व संतांना बोलावण्याचे काम सोपव, तो आणील बोलावून सगळ्यांना, एवढे कर बरं का गणू! तुझे लई कल्याण होईल" व पुढे ही गोष्ट खरी ठरली. दासगणूंनी पुढे संत चरित्रे काव्यमय भाषेत लिहिली, गायिली. ते ठिकठिकाणी रसाळ कीर्तने करू लागले. आपल्याला नोकरीत आलेले अनुभव ते आपल्या कीर्तनातून रंगवू लागले. साईबाबांचे दासगणूंवर भारी प्रेम. कधी कधी बाबा त्यांना 'गणू, तू अमुक गावी जा' अशा सूचना करीत. त्या गावी गेल्यावर दासगणू तिथे होऊन गेलेल्या सत्पुरुषाची माहिती गोळा करीत व त्या टांचणावर मग दासगणू महाराज काव्यमय भाषेत चरित्र करीत. श्रीसाईबाबांनी त्यांच्या शृंगारिक काव्यरचनेला वारंवार धक्के देऊन त्यांची चित्तवृत्ती घडविली.

दासगणूंनी पोलिस खात्यातील नोकरी सोडून द्यावी म्हणून बाबांनीच आग्रह केला. ते नेहमी म्हणत, "गणू, आपण बूट पुसायला जन्मलो काय? आपण कुणाचे चाकर होऊ नये" पुढे बाबांच्या आशीर्वादाने दासगणू फौजदारी परीक्षा उत्तीर्ण झाले त्यांना बढती मिळाली. पण नंतर त्यांनी बाबांच्या सांगण्यावरून आपल्या नोकरीचा राजीनामा दिला.

श्रीसाईबाबांची आज्ञा शिरसावंद्य मानून दासगणू नांदेडला आले. त्यांना 'संतकवी' असा जो लौकीक झाला तो मोंगलाई प्रांतात. बाबांच्या आदेशवरून ते डोक्यावर पगडी किंवा अंगावर उपरणे न घेता कीर्तन करू लागले. कीर्तनाची बिदागी ते घेत नसत. श्रीसाईबाबांच्या अलौकिक कर्तृत्वाचा आपल्या किर्तनाच्या द्वारे प्रसार-प्रचार त्यांनीच केला. त्यांच्या श्रुतिमधुर कीर्तनामुळे सर्वसाधारण समाज श्रीबाबांच्या संतत्वाशी परिचित झाला. श्री. नानासाहेब चांदोरकरांच्यामुळे काही सुशिक्षित श्रीमंत व वरिष्ठ अधिकारी मंडळी श्रीसाईबाबांची भक्त बनली आणि म्हणूनच की काय दासगणूमहाराज व चांदोरकर यांना उद्देशून श्री. गोविंदराव दाभोळकर उर्फ हेमाडपंत यांनी साईसच्चरित्रा- मधे, "मुंबई प्रांती जी साईभक्ती, त्यास कारण या दोन व्यक्ती, साईबाबा कृपामूर्ती, यांचे हाती प्रगटली ॥" असे म्हटले आहे.

श्रीदासगणूमहाराजांनी आपल्या हयातीत असंख्य कीर्तने केली. सुंदर सुंदर पदरचना केली. हजारो काव्याच्या ओळी लिहिल्या. ता. २५ नोव्हेंबर १९६२ रोजी वयाच्या ९५ व्या वर्षी ते महाराष्ट्राला, आपल्या भक्तांना सोडून श्रीसाईस्वरूपी लीन झाले. ते आज जरी आमच्यात नसले तरी आपल्या काव्याने ते आपल्या सर्वांच्या जवळ आहेत. ज्ञानेश्वर महाराजांच्या पुण्यतिथीच्या दिवशीच महाराजांनी आपली जीवनयात्रा संपविली हे विशेष होय. ता. ६ जानेवारी रोजी येणाऱ्या त्यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्याने त्यांना कोटीकोटी प्रणाम.

---



# श्रीसाईनाथ रुग्णालयास देणगी

दादरच्या प्राझा टेलर्सचे चालक **श्री. व्यंकटराव मुळे** यांनी शिर्डीच्या श्रीसाईनाथ रुग्णालयास पंचवीस हजाराची देणगी दिली आहे. ही देणगी त्यांनी आपले चिरंजीव **श्री. लक्ष्मीकांत** यांच्या स्मरणार्थ दिली आहे. श्री. लक्ष्मीकांत हे मूत्रपिंडावरील शस्त्रक्रियेमुळे २५ फेब्रुवारी १९७४ रोजी श्रीसाई चरणी विलीन झाले. श्री. मुळे यांची वरील देणगी फिक्स्ड डिपॉझिटच्या स्वरुपात असून त्यातून येणाऱ्या व्याजातून रोग्यांवर औषधोपचार खर्च केला जाणार आहे.

# साकोरी आणि माताजी

• डॉ. के. भ. गव्हाणकर

तो दिवस बुधवारचा. दयार्णवकृत हरिवरदा वाचत होतो. रासक्रीडेचे वर्णन वाचता वाचता मनाची तंद्री लागली. इतक्यात पूज्य, माननीय स्वामी कृष्णन् जणू श्रीसाईबाबांच्या वेषात आले आणि मला मोटारीने तारीख २१–८–७८ रोजी शिर्डीस व गुरुवारी सकाळी साकोरीस घेऊन गेले. तेथे प्रत्यक्षात श्रीकृष्णलीला दिसली. बालयोगिनी माता गोदावरी तन्मयतेने श्री गोपालकृष्णाची पूजा करीत होत्या. एकनिष्ठेने, एकचित्ताने प्रत्येकजण आपल्या आवडी प्रमाणे भाग घेताना दिसत होता. कोणी सुवासिक फुले, कोणी आरतीसाठी समया निरंजने करून आणीत, तर कोणी नैवेद्यासाठी साय, लोणी, फळे वगैरे आणित होते. कोणी फुलांच्या माळा–हार–गुंफीत होत्या.

गोपाळ–कृष्णाला जणू काय आपल्या तान्ह्यालाच स्नान घालून माताजीने आपल्या हळुवार हाताने कपडे घातले, बारीक किनाऱ्या करून पितांबर नेसवला. नंतर एक एक दागिना घातला, कृष्णाच्या मस्तकाच्या मागे निळ्या गोकर्णाची वेणी लावली. तुळशीचे, प्राजक्ताचे हार घातले व फुलांची सुंदर सजावट केली. चरण कमलावर तुळशीदल व नाजूक सुगंधी फुलें वाहिली. श्रीकृष्णाच्या आजुबाजूला तुळशीचे गुच्छ ठेवले, चांदीच्या गायी ठेवल्या. फुले वाहून झाल्यावर कन्हैयाचे हातात मुरली दिली. तालसुराच्या ध्वनीत काही कन्याकुमारी गोपी–गीत आपल्या मंजुळ स्वराने व गोड गळ्याने गात होत्या.

" नंदनंदन हरे " आरती सुरू झाली, पंचारतीच्या झगझगाटात मूर्तीचे तेजस्वी मुखमंडल चमकू लागले आणि दिव्य प्रकाशाची ज्योत सर्वत्र पसरली. आरती झाली, पुष्पांजली झाली, नैवेद्य झाला, माताजींची प्रार्थना संपली आणि गोपाळकृष्णाच्या जयजयकारात रसिकांना भक्तिरसाची मेजवानी व गोड प्रसाद ठेवून व कृष्णदर्शन घडवून घरात निघून गेल्या. काय तो एकविधा भक्तीचा सोहळा वर्णावा ? १९७१ साली हरिवरदा वाचीत असता, द्वारकेचे व सोरटीसोमनाथाचे वर्णन वाचले. मनाला आनंद झाला व दुःखही झाले. दुःख प्रत्यक्षात बघता येत नाही म्हणून. त्या वेळेस श्रीसाईमाऊलीस म्हणालो " हे प्रभोसाई ! माझी द्वारका शिरडी व तू द्वारकाधीश " हाच आनंद मला जन्मभर दे म्हणजे झाले ! "

काय सांगू बाबांची अगाध लीला ? एका गृहस्थास पाठवून मला विमानातून सौराष्ट्रात नेले व सोरटी सोमनाथ व द्वारकेचे दर्शन दिले. त्या द्वारकेचे पाहिलेले दृश्य

व भोगलेला आनंद. झपतालात गायलेल्या गीतांच्या नादात व टाळ तबल्याच्या झणकारात परत एकदा भोगण्याचे भाग्य लाभले.

संत चूडामणी उपासनी बाबांनी साकोरी स्मशान भूमीचे स्थित्यंतर करुन त्यांनी इवलेसे कन्याकुमारी स्थानाचे रोपटे लावले, ते आज माताजीने गगनाला भिडविले. मथुरा वृन्दावनाची शोभा आणली. जिकडे तिकडे लहान, मोठे, कन्याकुमारींचे ताटवे, वेदमंत्रांनी व गायत्री मंत्रानी शिंपून, त्यांच्यात जीवंतपणा आणला आहे. त्यातील प्रफुल्लता, शहाणपणा व प्रेमानंद बाहेर ओतू जात आहे. त्यातील परिमल सर्वत्र दरवळत आहे. मुरलीधराच्या मंदिरात ( उपासनी बाबा मंदिर ) रासक्रीडेच्या जल्लोशात व टिपऱ्यांच्या नादात प्रेक्षक व भक्तगण डोलत आहेत. कुंजवनात क्रीडा करणारा रासेश्वर राधेबरोबर फेर धरण्यात दंग झाला आहे. नंदनंदन गोपालकृष्ण आपल्या सवंगड्यांसह व गोपीसह इकडे तिकडे मोकळेपणाने वागडत आहेत. त्यांच्या नुपूरातून निघालेल्या, मधुर, मंजुळ रुणझुण नादाने, वृन्दावनातील वृक्ष, लता, वेली, यांना टवटवीतपणा, तजेलता, हिरवासुंदर रंग व पुष्प, फळांचा साक्षात्कार झालेला दिसत आहे. जणू काय वसंताचा आविर्भाव माझ्यासारख्या भक्तरूपी वृक्षाला फलसंपन्न व प्रेमसंपन्न झाला तर त्यात नवल कसले ? निस्सीम प्रेमात हे भाग्य प्रकटते.

१९६८ साली योगीराज सद्‌गुरू साईबाबांची पालखी, त्यांच्या ५० व्या पुण्यतिथी निमित्त मुंबईस आली होती. त्यावेळेस साकोरी आश्रमातील कन्याकुमारींचे, सती माताजींच्या नेतृत्वाखाली वेदपठण झाले. त्यांचा तो पीतवस्त्र पेहेराव, शिस्तबद्ध वागणूक आणि त्यांच्या कोमल कंठातून गोडमधुर निघालेले, अस्खलित वेदोच्चार वातावरणात भक्ती, पावित्र्य, मनाचा मोठेपणा इत्यादि सर्व निर्माण करीत होते. परमेश्वराच्या नावाच्या नादश्रुतीत प्रेक्षकांना डोलत ठेवले होते, गोड सुरेल पुंगीच्या नादात विषारी नागसुद्धा डोलतो. तेथे मुमुक्षुची काय कथा ? मात्र ईश्वराच्या नामातील नादब्रह्म–मग तो वेद असो की नाम असो–निनादत ठेवण्याची हातोटी साधली पाहिजे. उच्चाराचे आधी वाणी, तिचे आधी कंठ, त्याचे अगोदर प्राण व प्राणाच्यापूर्वी श्रीहरिसाई. त्याला महदाकाशातून ज्ञानात ज्ञान आनंदात, आनंद जीवात व जीव प्रेमात असा प्रेमभावाचा–महाभावाचा, आनंद भावाचा प्रसाद माताजीने अनुभवला व तो आनंद कन्याकुमारींच्या माध्यमातून सर्वांस दिला. अशा थोर विभूतींची थोरवी मी काय गाणार ? एवढे खरे की माताजीने त्यांना नुसतेच वेदपठण–संस्कृत शिकविले नाहीतर, त्यातील नामाची–उच्चाराची व स्वराची अवीट गोडी चाखविली. म्हणून त्यांचा प्रकाश सर्वत्र पसरला.

नाहीतर तुकाराम महाराज म्हणतात — ‘ चारी वेद जयासाठी । त्याचे नाम धरा कंठी ॥ वेद पठण करुन शहाणपणा कशाला मिरवितोस ? तर तो वेद ज्याकरिता त्याचे नामस्मरण कर. वेदाने जीव शहाणा होतो पण नामाने तो बाळासारखा होतो. आई लहान बाळाला जवळ करते आणि थोर मुलाला दूर ठेवते. वेद म्हणजे भगवंताचे

क्रीयागुणगान करणारा आणि उपनिषत् सात्विक गुणांचे वर्णन करणारे " तिहीं गुणी आवृत । हे वेद जाणे निभ्रांत । म्हणोनि उपनिषदादि समस्त । सात्विक ते ॥ ज्ञा.२–२५६ म्हणजे निर्गुण आत्मा नुसते जाणतात, परंतु त्या आत्म्याच्या प्रेमरूपाचा भोग या जाणण्यात नसतो. तो नामात असतो. वेद जया गाती । आम्हा तयाची संगती ॥ तु. महा. एकदा शंखासुराने ब्रह्मदेवापासून वेद हिसकावून नेले. त्यामुळे तो रडत बसला. बराच वेळ रडत बसल्यावर कळवळून देवास हाक मारली. त्या हाकेने देव धावत आले. वेद आणून देणारे देव ज्या नामाने धावत आले ते न मागता ब्रह्मदेवाने वेद मागितले. नाम हे वेदाचे मूळ आहे. तेच सर्वांचे सार आहे. सार, सार, सार विठोबा नाम तुझे सार।

वेदाला जे आकळत नाही ते नामाने आकळते. देव विटेवर का उभा आहे ते वेदासही समजले नाही. ' सखी पुसे सखयेसी । युगे झाली अठ्ठाविसी । उभा ऐकला संत सुखी ! अद्यापीवर । कटावरी कर । भीवरातीर । वाळुवंटी संत उभा सभा ॥ १ ॥ देव कांही विटेवरी उभा उभा ॥ धृ ॥ नका पुसुं बाई । वेदासी कांही । कळलेंचि नाही । शेष शिणला ।

जाहल्या द्विसहस्र जिभा जिभा ॥ २ ॥

नामस्मरण म्हणजे प्रेमाने आळवणे व या आळवण्याचाच देवास छंद असल्याने, त्यास मोहून प्रभु विटेवर उभा आहे. हे नामधारकास ठाऊक असते, नामाने प्रभु बांधला जातो, शहाणपणाने अगर विद्वत्तेने नव्हे. ' अर्जुना ! वेदविद जऱ्ही जाहला । तरी माते नेणतां वाया गेला । कण सांडूनि उपाणिला । कोंडा जैसा । ( उपाणिला = पाखडला )

देवाची मैत्री जोडली तर सर्व जग आपल्यावर कृपामृताचा वर्षाव करील, हा भागवत धर्माचा स्वानुभव सिद्धांत तुकोबारायांनी सांगितला आहे. असा तो देव आहे तरी कोठे ? या प्रश्नाला ' देव आहे सुकाळदेसी अभाग्यासी दुर्भिक्ष ! ' जगात देवाचा सुकाळ आहे, मात्र अभागी असतात त्यांना देवाचे दुर्भिक्ष जाणवते; असे उत्तर तुकाराम महाराज देतात. देवाची कृपा मिळवावयाची म्हणजे देवाविषयी प्रेम अंतःकरणात बिंबले पाहिजे. ते कसे व्हावे ? त्याचा मार्ग ' प्रेम तेथे वास करी मुखी उच्चारितां हरी । भगवन्नामस्मरण करा की अंतःकरणात प्रेमाचा निवास आपोआपच होईल. हा सर्व परमार्थ साधावयासाठी ' संतसमागमी धरूनी आवडी करावी तातडी परमार्थी । संतसमागम ही परमार्थ प्राप्तीची पहिली पायरी आहे. त्या समागमात नामस्मरणाची गोडी वाटते. नामस्मरण घडले की ईश्वराविषयी प्रेम उचंबळते आणि सर्वत्र जनींवनी ' देव आहे सुकाळदेसी ' अशी प्रचीती येते. श्री सद्‌गुरु साईबाबांची शिरडी द्वारका तर साकोरी हे वृंदावन–भक्तीचा सौभाग्य सोपान का नव्हे ? त्या साकोरी क्षेत्राचे परमपावन दर्शन घेण्याचे सद्‌भाग्य मला लाभले आणि भगवत्प्रेमाचे साकार स्वरूपच मी पहात आहे अशी श्रद्धा तत्क्षणीच माझ्या अंतःकरणात उदय पावली.

जोपर्यंत जीव साक्षी रहातो तोपर्यंत प्रेमरूप श्रीहरि-ऐक्य सुख प्रतीत होत नाही. जे सुख लक्ष्मीला, शंकराला, वेदाला, शेषाला साक्षित्वाने मिळाले नाही, ते सुख राधेला मिळाले. राधेच्या ठिकाणी निस्सीम भक्ती आणि ध्यान होते. तिने आत्मसमर्पण केल्यामुळे श्रीकृष्ण बांधला गेला व देव राधेघरी सुखावला. ह्या श्रीकृष्ण-प्रेम-भक्तीचा प्रभाव आज साकोरीत आढळतो. माताजींच्या प्रेमळ सहवासाने सतत नामसंकीर्तनाने व चिंतनाने कन्याकुमारींच्या मनाचे दिव्यत्व, उन्मनवैभव व उन्नत विकास दिसून येतो. त्यांच्या रोमारोमातून श्रीकृष्णभक्तीचा विद्युत् प्रवाह खेळत आहे, त्यामुळे प्रचंड शक्तीचा उदय झाला आहे. याचे कारण जर काय असेल तर त्यांचे पातिव्रत्य. त्यात हळुवारपणाने माताजीने रक्षण केले आहे. पातिव्रत्य का रक्षण करावे? तर रक्षण न केल्यास नाश म्हणजे आत्महत्याच होते.

शिष्यामध्ये गुरुचे पूर्णरूप पहावे, मुलामध्ये बापाचे प्रतिबिंब पहावे तसेच सती गोदावरी माता यांच्यासारख्या प्रेमरूपावरूनच महाराजांचे रूप अवलोकन करता येण्यासारखे आहे. मानवी जीवनातील परसीमेचा अनुभव जेथे व्यक्त होतो ती संत मूर्ती सती गोदावरीमाता होय. सद्गुरुपदाची परिपक्वदशा म्हणजे संतत्व होय. सद्गुरूंच्या मूर्ती भेटणे दुर्लभ तर त्याहून सर्वपदावर आरुढ झालेली महासाध्वी लाभणे अत्यंत दुर्लभ. सद्गुरुपदावर आरुढ झालेले विषयसुखाच्या पैल असणाऱ्या ज्ञानानंदात रमणारे असतात तर ज्ञानाचे सूक्ष्मरूप प्रेम त्या प्रेमाच्या लहरीत आणि ऐश्वर्यात संत विराजतात. त्यांच्या वचनांनी, संगतीने जिवात प्रेमगुण प्रगट होते. 'प्रभु' अनिर्वचनीय प्रेमस्वरूप आहे हे खरे, पण त्या प्रेमाचे दर्शन त्या प्रेमाच्या अनुभवात मग्न असणाऱ्या मूर्तींच्या द्वारेच व्हावयाचे हे दर्शन बाहेरून नसून स्वजीवीतात व्हावयाचे. संत दर्शनाने आपलेच प्रेम आपणास भेटावयाचे हाच संतांचा सहज अनुग्रह.

प्रेम न ये बोलतां। प्रेम न ये दावितां।
अनुभव चित्ता। चित्त जाणे ॥

एकान्त-सौभाग्य साकोरी वृंदावनात आहे. तेथेच नयन सुंदर श्रीसाईकृष्ण नयनी उभा राहिला. प्रभो, १९१५ साली वयाच्या १२ व्या वर्षी मुखात केळ भरवून आपलेपणाचा हात पाठीवरून फिरविलास-त्यावेळी तुझ्या हस्तस्पर्शाने सर्व गात्रे पुलकीत झाली. १९३८ साली स्वप्नात मंत्रोपदेश करून ब्रह्मीभूत ब्रह्मचारी श्रीगणेश भक्त श्री. त्र्यंबक विठ्ठल सावंत यांचे मुखातून तोच दिलास। त्यावेळी जी स्थिती जो आनंद अनुभवला तोच आनंद व साक्षात्कार साकोरी येथे झाला.

हे गोकुळकुलेंद्र पीतांबरधारी प्रभो साई। आनंद स्वरूप आनंदकंद भगवंताचा मधुआनंद सर्वांस आनि देऊ दे, आणि शुक्लेंदुवत पूर्णचंद्राचा-प्रेमशक्तीचा चंद्रप्रकाश सर्वत्र पसरू दे. हीच बाबा तुझ्या चरणी प्रार्थना.

'हरि ॐ'

## मानवतेचा थोर उपासक

# संत फ्रॅंसिस झेवियर

• सदानंद चेंदवणकर

गोमंतक किंवा गोव्याला 'पूर्वेकडील रोम' या नावाने संबोधतात. गोव्यामध्ये जुनी जुनी प्रार्थना मंदिरे खूप आहेत. या अशाच एका प्रार्थना मंदिरात एका प्रख्यात संताचे शव गेली साडेतीनशे वर्षे ठेवण्यात आलेले आहे व ते शव आजही जसेच्या तसेच आहे हे एक मोठे आश्चर्य होय. त्या थोर महान संताचे नाव आहे फ्रांसिस झेवियर.

फ्रांसिस झेवियर यांचा जन्म ७ एप्रिल १५०६ रोजी कॅसल ऑफ झेवियर येथे झाला. नवारेचे राजे जॉन (तिसरे) यांचे प्रमुख सल्लागार डॉन जॉन जास्सो यांचे फ्रान्सिस हे धाकटे चिरंजीव. त्यांना शिक्षणाची भारी आवड. त्यांनी १५२४ मध्ये पॅरिस विद्यापीठात जाऊन एम. ए. पर्यंत शिक्षण घेतले. १५३० मधे कॉलेज द बुव्हेमधे त्यांची प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. कॉलेजात असताना त्यांचे मित्र सेंट इग्नेशिअस लोयोला यांनी फ्रांसिसवर फार मोठा प्रभाव टाकला त्यामुळे फ्रांसिस अध्यात्माकडे वळले. त्यांनी आपली सुखासीन नोकरी सोडून देऊन ख्रिस्ताच्या कार्याला वाहून घेण्याचे ठरविले. ते स्वतः मिशनरी बनले आणि लौकरच आपल्या कार्यामुळे "पूर्वेकडील धर्मप्रचारक शिरोमणी" म्हणून ते ओळखले जाऊ लागले.

भारतात ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराची धुरा रोममधील धर्मपीठाचे प्रमुख पोप पॉल यांनी फ्रांसिसवर सोपविली. त्यावेळी फ्रांसिसचे वय अवघे ३५ वर्षांचे होते. ७ एप्रिल १५४१ रोजी फ्रांसिस जहाजाने पूर्वेला रवाना झाले. ते अति पूर्वेला मलाया, जपान व चीनपर्यंत जाऊन पोचले. ते जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांनी मोठ्या निष्ठेने धर्मप्रसाराचे कार्य केले. गोव्यात त्यांच्या कार्याचे मुख्य केंद्र होते. गोव्यातून धर्मप्रचाराच्या मोहिमेसाठी म्हणून ते २१ नव्हेंबर १५४२ रोजी लिस्बनहून गोव्यात येऊन दाखल झाले. त्यांच्याबरोबर गोव्यात नव्याने नेमलेला गव्हर्नर अल्फांसो डी-अल्बुकर्क हा पण होता. त्याच्या दाट परिचयाचा फायदा झेवियरला गोव्यात राजसत्ते-कडून सर्व सवलती मिळण्यात झाला. गोव्याच्या निसर्ग सौंदर्याने मोहित झालेले झेवियर लगेच आपल्या मिशनरी कार्याला लागले. त्याकाळी गोव्यातील वातावरण या कार्याला प्रतिकूल होते. इस्लामी व्यापाऱ्यांनी पुन्हा पुन्हा गोव्यात येऊन तिथे ठाण मांडले होते. हिंदुधर्माची संस्कृती तर गोव्याच्या मातीतील कणाकणांत भिनली होती. अशा परिस्थितीत झेवियरने कार्य केले ते म्हणजे गरीब रूग्णांची सेवा करण्याचे. सर्व धर्मांच्या पिडीत रुग्णांमधे जाऊन त्यांनी त्यांच्याशी जवळीक केली. शासनाकडून त्यांच्यासाठी

रुग्णालये बांधून घेतली व अशा तऱ्हेने त्यांना आपल्या धर्माकडे आकृष्ट केले. आफ्रिकेतून आणलेल्या गुलामांची जुलमातून झेवियरनेच सुटका केली.

आपले गोव्यातील हे कार्य उरकून झेवियरने २१ नोव्हेंबर १५५२ रोजी जपानकडे जाण्याचे ठरविले. चीनचा पूर्वकिनारा, जपान, इंडोनेशिया या अतिपूर्वेकडील देशात खिस्ताचा पाईक म्हणून कार्य केल्यावर २ डिसेंबर १५५२ रोजी फ्रांसिस झेवियरची जीवनज्योत एकदम मालवली. त्यावेळी त्याचे वय अवघे ४६ वर्षांचे होते. फ्रांसिस खिस्तवासी झाले ते एका सांचिवनच्या (चीनच्या) किनाऱ्याजवळ उभ्या असलेल्या एका जहाजावर. समाधानी निद्रेचे सुख त्यांच्या मुखावर ओसंडत असलेले त्यांचे शरीर दुसरे दिवशी समुद्रकिनारीच पुरण्यात आले. पण ही गोष्ट काही कडव्या धर्मगुरूंना रुचली नाही. त्यांनी त्यांचे शव उकरून गोव्याला नेले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे उकरून काढल्यानंतर चुन्यामध्ये ठेवलेले झेवियरचे शव जसेच्या तसे त्यांच्या हाती लागले. त्यांची त्वचा जशीच्या तशी असल्याचे आढळले. अशाप्रकारे दैवी शक्तीची प्रचिती आल्यामुळे अनुयायांच्या कार्याला गती मिळाली. अनुयायांनी झेवियरचे शव मृत्यूनंतर तब्बल सव्वा वर्षांनी १५ मार्च १५५४ रोजी गोव्याच्या भूमीवर आणले. झेवियरना गोव्याचे महान संत हा किताब प्राप्त झाला. झेवियरांचे शव जेव्हा गोव्याच्या भूमीवर पोचले तेव्हा पोर्तुगीज व्हाइसरायपासून तो गुलामापर्यंत त्यांचे सर्वांनी प्रचंड स्वागत केले. गोव्यातील ख्रिश्चन धर्मीय जनतेला दैवी शक्तीचे प्रचंड भांडार मिळाले याबद्दल आनंद झाला. गोव्यातील काही समाजकंटकांच्या संशयावरून व्हाइसरॉयने आपल्या खास वैद्याला शवाची तपासणी करण्यास सांगितले. तेव्हा त्यांनी आपल्या अहवालात लिहिले की, कोठलेही रसायन न वापरता एवढ्या कालावधीनंतर राखलेले हे मृत शरीर पाहून हा एक चमत्कार आहे अशी वैद्यकीय दृष्ट्या खात्री झाली आहे. कारण तोंडावरील काही ओरखड्या व्यतिरिक्त शरीराची कुठेही झीज झालेली नाही, उलट पोटामध्ये बोट चेपून बाहेर काढले असता बोटाला तांबूस रक्तही लागले. या सर्व इतिहासावर विश्वास ठेवणे न ठेवणे हे प्रत्येकाच्या श्रद्धेवर अवलंबून आहे.

सेंट झेवियरचे शव १७५९ साली एका चंदेरी पेटीत सांभाळून ठेवण्यात आले. त्यांच्या शवाचे पहिले प्रदर्शन १० फेब्रु. १७८२ रोजी आयोजित करण्यात आले. हे प्रदर्शन दोनच दिवस चालले पण त्यानंतर १८५९, १८७८, १८९०, १९००, १९१०, १९२२, १९३१, १९४२, १९५२, १९६१ व १९६४ साली प्रदर्शने झाली. यंदाचे प्रदर्शन शेवटचे आहे असे सांगितले जाते. ते जुन्या गोव्यात सुप्रसिद्ध बो जेझुस बॅसिलिकामध्ये ठेवण्यात आले आहे. पण प्रदर्शनाच्या काळात ते शव 'सी कॅथेड्रल' मध्ये ठेवण्यात येते. हे कॅथेड्रल म्हणजे जगातील एक सर्वांत मोठे प्रार्थना मंदिर आहे. सेंट फ्रॅंसिस झेवियरच्या शवाचे दर्शन घेण्याकरिता यंदा जगाच्या कोनाकोपऱ्यातून भाविकांची नुसती रीघ लागलेली आहे.

● ● ●

गाठीभेटी – ६

# श्रीसाईभक्त संगीत दिग्दर्शक–सी. रामचंद्र

• सदानंद चेंदवणकर

सुविख्यात संगीत दिग्दर्शक सी. रामचंद्र उर्फ रामचंद्र नरहर चितळकर हे परम साईभक्त आहेत. कितीही काम असो, दिवस कितीही गर्दीचा असो पण साईबाबांचे निदान एकदा तरी मनःपूर्वक नामस्मरण केल्याशिवाय त्यांचा दिवस पूर्ण होत नाही. त्यांच्या उभय पत्नी सौ. आशाताई व सौ. शांताबाई या पण साईभक्त आहेत. साई या नावाचे एवढे जबरदस्त आकर्षण त्यांना आहे की त्यांनी आपल्या दादर शिवाजी पार्क जवळच्या आपल्या निवासस्थानांची नावे 'साई साऊली' व 'साई प्रासाद' अशी ठेवलेली आहेत. त्यांनी आपल्या 'श्री साई साऊली'मध्ये एक स्वतंत्र देवघर बांधले असून त्यात बाबांचा एक संगमरवरी सुबकसा बसका पॉप्युलर पोजचा छोटा पुतळा आहे. व त्याच्या




सी. रामचंद्र

सभोवार इतर देव देविकांची गर्दी आहे. त्यांचा एकमेव लाडका देव साईबाबाच आहे. १९४२ सालापासून सी. रामचंद्र साईभक्ती करीत आहेत. त्या वर्षी श्री. जाधव नावाच्या त्यांच्या एका साईभक्त मित्राने त्यांना मुद्दाम शिर्डीस नेले. बाबांच्या पूनीत भूमीने तेव्हापासून ते जे आकर्षित गेले ते अगदी आजतागायत. प्रत्येक वर्षी ते वेळात वेळ काढून शिर्डीस जातातच. जेव्हा समाधिमंदिरात बाबांचा भव्य पुतळा नव्हता फक्त तसबिरच काय ती होती तेव्हापासूनची समाधी मंदिरातील सारी स्थित्यंतरे त्यांना माहित आहेत.

सी. रामचंद्र मूळ पुणतांब्याचे. चांगदेवांच्या गावचे. त्यांचे वडील नरहर विठ्ठल चितळकर रेल्वेत नोकरीस होते.

श्री. सी. रामचंद्र थोर कलावंत असूनही अत्यंत निरहंकारी वृत्तीचे आहेत. शिरडीला जेव्हा ते प्रथमच १९४२ साली गेले, तेव्हा त्यांची गरोदर पत्नी सोबत होती. अण्णासाहेबांचा ज्योतिषाचाही अभ्यास असल्यामुळे आपले अपत्य जगणार नाही याची त्यांना जाणीव होती. परंतु ही गोष्ट त्यांनी आपल्या पत्नीला सांगितली नाही. श्रीबाबांच्या समाधीसमोर त्या उभयतांनी मनात प्रार्थना करून नारळ फोडला तेव्हा तो नारळ नासका निघाला आणि खरोखरीच दुर्दैवाने ते अपत्य जगले नाही. दुसऱ्या अपत्याच्या वेळीही ते उभयता शिरडीला गेले. त्यावेळी अधिक काळजीपूर्वक नारळ निवडून घेऊन तो त्यांनी फोडला. परंतु पहिल्या वेळचीच पुनरावृत्ती घडून आली. जणू काही बाबांनी हा कौलच दिला होता.

श्री. सी. रामचंद्र आज एक श्रेष्ठ संगीत दिग्दर्शक म्हणून ओळखले जातात. १९३९ साली हर्षाच्या कादंबरीवरून 'नागानंद' नावाच्या चित्रपटात चितळकरांनी पहिली भूमिका केली. लहानपणापासूनच चित्रपटात पडायचे हा त्यांचा निर्धार होता. बोलपटांचे युग चालू होते व हळूहळू संगीतालाही महत्व प्राप्त होऊ लागले होते. त्यामुळे अभिमानाचा नाद सोडून देऊन संगीताकडे त्यांनी आपला मोर्चा वळविला. सातव्या वर्षापासून त्यांना संगीताची आवड होती. सोहराब मोदींच्या 'मिनर्व्हा मुव्हिटोन मधे संगीत शाखेत काम केल्यावर त्यांच्या गाजलेल्या 'पुकार' चे संगीतकार मीरसाहेब यांचा सहाय्यक बनण्याची संधी चितळकरांना मिळाली. याच वेळी भगवानशी ओळख झाल्यामुळे चारपाच तामील चित्रपटाचे ते संगीतकार बनले. द्वारका खोसला यांच्यामुळे निर्माता–दिग्दर्शक जयंत देसाई यांचेशी चितळकरांचा संबंध आला. देसाईंना हा तरुण संगीतकार आवडला परंतु त्यांचे नाव रामचंद्र चितळकर हे आवडले नाही त्यांनीच चितळकरांना सी. रामचंद्र बनविले. बाबांचे भक्त बनल्यानंतर सी. रामचंद्रनी पहिला हिंदी चित्रपट दिग्दर्शित केला त्याचे नाव 'सुखी जीवन' (१९४३). त्यानंतर त्यांनी 'शहनाई', 'सण्डे के सण्डे', 'सरगम', अलबेला, समाधि खिडकी, झांझर, संग्राम, परछाई, नास्तिक, आझाद, अनारकली, सफर, यास्मिन, नवरंग, पैगाम, अमरदीप, वीर भीमसेन, रुठा न करो अशा एक ना दोन असंख्य चित्रपटांना त्यांनी संगीत दिग्दर्शन केले आहे. श्रीसाईबाबांची पन्नासावी पुण्यतिथी १९६८ साली साजरी झाली तेव्हा सी. रामचंद्रनी ४० मिनिटांची एक लॉंग प्ले रेकॉर्ड सादर केली त्यामध्ये बाबांची भजनं, अभंग, गाणी, आरत्या इ. सर्व काही आहे. त्यामध्ये रफी अहमद, मुकेश, महेंद्र कपूर, स्नेहल भाटकर इ. कितीतरी गायक आहेत. अनेक साईभक्तांना ही ध्वनीमुद्रिका आवडली व कित्येकानी ती आपल्या संग्रही ठेवली आहे. अनिल विश्वास

व सज्जाद हे अण्णा उर्फ सी. रामचंद्रांचे आवडते संगीत दिग्दर्शक असून आपल्या वैयक्तिक संगीतकलेत ते नागपूरच्या श्री. शंकरराव सप्रेंना आपले गुरु मानतात.

श्रीसाईबाबांच्याबरील आपल्या असीम श्रद्धेसंबंधी बोलताना अण्णा सांगतात की – बाबांनी हयात असतानाच नव्हे तर समाधी घेतल्यावरही आजतागायत जे अनुभव भक्तांना दिले आहेत त्यात त्यांचा लोककल्याणाचाच हेतू आहे. माझीतरी बाबांच्यावर एवढी श्रद्धा आहे की त्यांच्यासारख्या श्रेष्ठ विभूतीच्या हातून लोकांना भूलविण्यासाठी कधी काही घडले असे वाटत नाही. बाबांनी जे कार्य केले ते मला आवडते. श्रीबाबांच्याबद्दल त्यांच्या मनात नितांत आवड आहे व या आवडीचेच रूपांतर अनन्यासाधारण भक्तीत झाले आहे. प्रेमाची आत्यंतिक अवस्था म्हणजेच भक्तीभाव असे त्यांचे मत आहे.

"साईभक्तीचा आपल्याला काय अनुभव आहे ?" याबद्दल विचारता अण्णा म्हणतात – ज्यावेळी माणसाला माणसाकडून सहाय्य मिळत नाही. मनुष्य अनेक व्याधींनी व नाना अडचणींनी घेरला जातो तेव्हा त्याची बाबांसारख्या विभूतीवरील श्रद्धा खात्रीने दिलासा देऊ शकते. अशांत मनाला शांत करण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या नामजपाच्या ठिकाणी आहे. मला स्वतःला जेव्हा जेव्हा रिकामा वेळ मिळतो तेव्हा तेव्हा मी बाबांचा जप करतो. त्यायोगाने माझे मन शांत रहाते. मी जगभर हिंडलो फिरलो आहे तरीसुद्धा सर्वत्र मी बाबांचे नामस्मरण करीत आलो आहे. जीवनात कधी अडीअडीचणींचा प्रसंग उद्‌भवला तर त्याला हसतमुखाने तोंड देण्याचे मनोधैर्य माझ्या ठिकाणी केवळ त्यांच्या नामस्मरणाने होते.

"बाबांच्या हातून घडलेले कोणते विशिष्ट कार्य आपल्याला महत्वाचे वाटते ?" या माझ्या प्रश्नावर उत्तर देताना अण्णासाहेब चितळकर म्हणतात–आज आपण राष्ट्रीय ऐक्याची भाषा बोलतो पण पंचावन्न वर्षांपूर्वी हे तत्वज्ञान जेव्हा अस्तित्वात नव्हते तेव्हा समतेची शिकवण देऊन सर्व धर्मियांना शिर्डीच्या द्वारकामाईत एकत्रित आणून आपण सर्व भाईभाई हे तत्वज्ञान सुलभतेने त्यांना आचरण्यास बाबांनीच लावले. तत्कालीन लोकांना समतेचा धडा देऊन भक्तिमार्ग हाच सुखाचा मूलमंत्र आहे हे त्यांनी समाजाला शिकविले हे साईबाबांनी केलेले आदर्श कार्य मला अतिशय आकर्षक व महत्वाचे वाटते."

अण्णासाहेबांसारख्या थोर कलावंताची बाबांच्या ठायी असणारी भावनात्मक पण डोळस भक्ती पाहून कुणाचेही मन भारावून जाईल यात शंकाच नाही.

# वाऱ्यावरचे विचार

● द. शं. टिपणीस

ही सत्य घटना आहे. नावे असत्य आहेत. शामराव हे एक अध्यात्मातील विचारवंत होते. त्यांना सद्गुरु लाभला नव्हता. सद्गुरूचे चरण लाभावे अशी त्यांना तीव्र इच्छा होती. पण त्याच्या मागे लागून ते सद्गुरुच्या शोधात वणवण फिरत नसत. अध्यात्माचा अभ्यास असल्यामुळे ते जाणत होते की आपण सद्गुरु शोधत बसू नये. सद्गुरुच आपल्या शोधात असतो. आपली जरूर ती तयारी झाली की तो होऊन आपल्या पुढे उभा राहतो व आपले चरण पुढे करतो. अध्यात्मात आपली योग्यता किती आहे, आपण कोणत्या पायरीवर यत्तेत आहोत हे आपले आपणास समजणे शक्य नाही. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे माप विद्यार्थी स्वतः घेऊ शकत नाहीं. शिक्षकाने ते ठरवावयाचे असते. अमक्याची भक्ति कमी तमक्याची जास्त अशी तुलना करीत बसणे म्हणजे वायफळ बडबड आहे. आपला 'मी' सद्गुरु ओळखू शकतो. सद्गुरुच्या कृपेची याचना करीत राहावे. त्याच्या शोधात फिरू नये. सद्गुरु अगदी आपल्या जवळच असतो. त्याला घेऊन आपण हिंडत असतो. तो आपणास दिसत नाही. तशी आपणास जाणीव नसते, स्वतःचे डोळे आपण स्वतः पाहू शकतो का ? समोर आरसा आला कीं मग आपण आपले डोळे पाहू शकतो. ते कसे आहेत हे जाणू शकतो. आपले खरे रूप दाखवणारा आरसा म्हणजे सद्गुरु. तोच आपल्याला आपली जाणीव देतो. ज्ञान देतो. सद्गुरुचरणी बसले, त्यांनी आपल्याकडे पाहिले, एकादा शब्द आपल्याशी बोलले वा न बोलले, त्यांनी आपल्याला स्पर्श केला एवढेच नव्हे तर अदृश्य राहून कोणाच्याही रूपाने त्यांनी या हालचाली केल्या तरी आपल्याला ज्ञान होते. मनाच्या प्रश्नांची उत्तरे मिळतात. शंकाकुशंकांचा गुंता सुटतो. आपला आतला सद्गुरु ( हृदयस्थ ) स्फुरू लागतो व पाहिजे ते ज्ञान होते. आपला बाहेरील सद्गुरु हा भ्रम आहे. दोन्ही एकच. सद्गुरु ज्ञान देतो असं आपण म्हणतो पण खरं म्हणजे सद्गुरु काही देत नाहीं वा घेत नाहीं. आपल्या ठिकाणी ज्ञानदीप आहे. सद्गुरु फक्त ज्योतीला ज्योत लावतो. शामराव काही लिहीत असता त्यांना Black out ला मराठी प्रतिशब्द आठवेना. दोन दिवस शब्द आठविण्याचा प्रयत्न करीत होते. पण फुकट. दोन दिवसानंतर त्यांनी आपल्या बंड्याला विचारले, 'काय रे, Blackout याला मराठी शब्द काय ?' बंड्या पडला पंडित. तो अ ऊम करत बघत राहिला. एवढ्यात शामराव म्हणाले, "अरे, आठवला बघ, प्रकाशबंदी, दोन दिवस आठवतोय पण आठवता आठवेना. तुला विचारले आणि एकदम आठवले बघ." अगदी क्षुल्लक घटना. बंड्या सद्गुरु नव्हता. त्याच्या रूपाने सद्गुरूने अं ऊं केले आणि डोक्यात स्मृतिची ट्यूब चमकली असे शामरावाना वाटले.

त्यांचे मन भराभर बोलू लागले. काय बोलू लागले ? तेच तर एखदा वेळ सांगत आहे. ज्ञान देण्याची सद्गुरुची पुष्कळ वेळा अशी रीत असते. सगळं फिटिंग आहे. ज्ञान दिवा आहे. सद्गुरु फक्त बटन दाबतो. म्हणून कुठेही सद्गुरु शोधत फिरू नये. हृदयात आहे त्यालाच आळवावा.

## प्रकाशबंदी

१९७१ मध्ये अल्पायुषी पण बहुगुणी असं युद्ध झाले. लहान मूर्ति पण थोर कीर्ति असं ते युद्ध. अंधार हा हल्लीच्या युद्धाचा सोबती असतो तसाच शत्रू असतो. दोन्ही बाजूला सोबत करतो व दोघांचेही शत्रुत्व करतो. दोन्ही बाजू काळोखात उजेड शोधीत असतात. काळोखातील उजेड हा दोन्ही बाजूंचा काळ ठरू शकतो. म्हणून काळोखात उजेड दिसणार नाही याची दोन्ही पक्ष काळजी घेतात. काळोखात दिवे लावून उजेड पाडण्याचे काम नागरीक घरोघरी करीत असतात. युद्धकाली ही गोष्ट स्वतःला मारक व तारक असते. म्हणून युद्धात प्रकाशबंदी ( black out ) जारी करतात. तिची अमलबजावणी कडक रीतिने होते. लहानशा किरणावरून शत्रू वेध घेऊ शकतो व हजारो लोकांचे जीव धोक्यात येऊ शकतात. एरवही किती दिवे लावावेत याला निर्बंध नसतो व लोकही घरबंध पाळीत नाहींत. पण युद्धकाळी ही स्थिति धोकादायक असते. गडद अंधारात घरातील उजेड, दारे खिडक्या यांच्या बारीक सारीक फटीतून वा छिद्रातून बाहेर दिसू शकतो. प्रकाशबंदी लागू झाली कीं घरातील उजेड बाहेरून कोठल्याही बाजूने दिसणार नाहीं याची पूर्ण काळजी घरात मंडळींनी घेतली पाहिजे. मानवी जीवन हेही एक युद्धच आहे. आपल्या घराच्या अगदी आतील काळोखाच्या कोठडीत आपला हृदयस्थ सुसुप्त अवस्थेत असतो. तो जागा झाला की ज्ञानदीपाच्या झगझगीत प्रकाशाने कोठडी भरून जाते व तो प्रकाश घरभर भरून घराची गवाक्षे ( डोळे ) व फटी छिद्रे यातून, रोमरोमातून बाहेर दिसू लागतो, ज्या व्यक्तीच्या ठायी असं होतं ती व्यक्ती तेजःपुंजपणामुळे चटकन ओळखू येते व स्तुति, आदर, पूजा आदींचा वॉव वर्षाव होऊ लागतो. यातल्या व्यक्तीचा घात होण्याचा संभव असतो. रामकृष्ण परमहंस यांची एक कथा सांगतात. मातेची जेव्हा त्यांच्यावर कृपा झाली, आत्मज्ञानाचा दीप उजळला गेला तेव्हा त्यांच्या शरीरावर एक प्रकारचे दिव्य तेज झळकू लागले. हे पाहून रामकृष्णाना वाईट वाटले. ते रडू लागले धावत धावत कालीमातेच्या देवळात जाऊन त्यांनी तिच्या चरणावर डोके ठेवले व स्फुंदत स्फुंदत म्हणाले, “ आई, हे तू काय केलेस ? आतले बाहेर कशाला ? त्याने मला त्रास होईल. लोक माझी स्तुति करतील, पूजा करतील. मला अभिमान होईल. अहंकार वाटेल. आतलं आतच राहू दे. ” खरे आत्मज्ञानी साक्षात्कारी बाहेर काही दिसू देत नाहींत. प्रकाशबंदी कसोशीने पाळतात. आपण आपलं जडजवाहीर आतल्या खोलीतील कपाटाच्या अगदी आतल्या कप्यात जसे जपून ठेवतो केवळ निवडक प्रसंगी वापरण्यासाठीं बाहेर काढतो तसेच खरे ज्ञानी आपला ज्ञानदीप अगदी आतल्या खोलीत जपून ठेवतात व जरूर तेव्हाच

त्याचा उजेड दाखवतात. अंगावर दागदागिन्यांचे प्रदर्शन घेऊन गावभर फिरणे योग्य नव्हे. त्यात धोका असतो हे ओळखून वाटेल तेव्हा सर्वांदा बडबड करुन ज्ञानाचे प्रदर्शन करू नये. नाहीतर अभिमान, दंभ, लोभ आदींचे चौर हल्ले होऊन आपला मौल्यवान ठेवा नाश पावेल. अध्यात्माच्या वरच्या पायरीवर जाऊ इच्छिणाऱ्या मुमुक्षूने अशी प्रकाशबंदी पाळणे अधिकच जरूर आहे.

## ३ नदीचा उगम

नदीचे मुळ व ऋषीचे कुळ शोधू नये असं म्हणतात, ठीक. पण थोडा विचार करायला काय हरकत आहे. नदीचा उगम एखाद्या लहान कपारीत असतो. तो दिसत नाहीं. दिसतो तो त्या कपारीतून येणारा लहानसा झरा. तो कपारीतून नक्की कोठून येतो हे काही दिसत नाही. कपारीत पाहिले तर अंधार दिसतो. लौकिक अर्थाने दिसतो तोच उगम असं आपण मानतो. नद असो वा नदी असो त्याचा व तिचा उगम अगदी नगण्य वाटावा इतका क्षुल्लक असतो. भरलेल्या बादलीत तांब्या बुडवला तर तो भरेल पण उगमाच्या झऱ्याच्या वाहत्या पाण्यात ओंजळ बुडवली तर ती बुडणार नाहीं, मग भरणार कोठून ? उगमाच्या पुढील अफाट विस्तारात, ओंजळ तर राहू द्याच, तांब्या बाजूला ठेवा, एकावर एक चार माणसे उभी करा ती बुडून आणखी काही जागा शिल्लक राहील. गंगा नदी केवढी अफाट पण तिचा उगम अगदीच लहान. बिंदूतून सिंधू होतो तो असा. नदीचे मुळ सूक्ष्म असते व विस्तार इतका मोठा असतो कीं सबंध नदी माणसाच्या दृष्टीपंथात येऊ शकत नाही, जी दिसते तो काही भाग असतो. असंच जग मुळात मुळ इतके सूक्ष्मच नंतर इतके मोठे होते की सर्व सृष्टी मानवी दृष्टीत मावू शकत नाहीं. अफाट व भव्य कार्याचा उगम पुष्कळ वेळा क्षुल्लक वाटावा असा असतो. नगण्यातून भविष्य काळ अगण्य कार्य करतो. अणू किती लहान पण त्यातून भयंकर विध्वंसक शक्ती जन्मास आली ना ? निसर्गाने उघड केलेले हे गुपित लक्षात घेतले तर मानवाने कोणतेही कार्य क्षुल्लक का मानावे ? चिमुकल्यातून चपलतेप्रमाणे डोळे दिपवणारे कार्य जन्मास येणार नाही असे समजून निराश का व्हावे ? गंगा नदी उगम पावली तेव्हा अं कसलं हे पाणी याने काय होणार ? असं कुरकुरत स्वस्थ बसली का? नाहीं. ती हळूहळू वाहू लागली. वाढू लागली. तिला लहान सहान ओहळ येऊन मिळाले. पुढे छोट्या नद्यांनी व नंतर मोठ्या नद्यांनी सहकार्य दिले. तिचे कार्य फुगत फुगत.पुढे अफाट झाले व ती लक्षावधी लोकांची पोषणकर्ती गंगामाई झाली. मानवानेही सकृतदर्शनी क्षुल्लक वाटणारे कार्य निराश न होता चालू ठेवले पाहिजे. वहात राहा मदत येत राहील. जसं जसं चालत राहाल तसं तसं आजूबाजूचे सहकार्य मिळेल. सहकार्याचे सहस्र हात पुढे येऊन तुमचे कार्य झेलून धरतील व उंचावतील. पण आम्ही मानव कसे आहोत पहा. आम्हाला एकदम मोठे व्हायला पाहिजे. एका रात्रीत इमले उठले पाहिजेत. अल्लाउद्दीनाचा तो राक्षस गेला. आज पाहिजेत ते धीरे धीरे कार्य करणारे राक्षस. ☆

# लेखक–कवींचे प्रथम स्नेहसंमेलन
## शिर्डी, १९७५

श्रीसाईलीलेच्या लेखक–कवींचे प्रथम स्नेहसंमेलन शिर्डी क्षेत्री दिनांक १८, १९ जानेवारी १९७५ ला भरविण्यात येत आहे. या निमित्ताने श्रीसाई-लीलेच्या लेखक–कवींना परस्पर परिचय होण्याची सुवर्णसंधी मिळणार असून याहूनच श्रीसाईलीलेला विकासाच्या दृष्टीने कार्य करण्यास अवसर मिळणार आहे.

या दोन दिवसाच्या स्नेहसंमेलनात श्रीबाबांचे दर्शन, मेळावा, परिचय कार्यक्रम, श्रीसाईलीलेत काय असावे : काय नसावे, श्रीसाईलीलेची आणखीन उत्तरोत्तर प्रगती कशी काय साधता येईल इ. विविध विषयांवर चर्चा असा भरगच्च कार्यक्रम आयोजिला जाईल.

श्रीसाईलीलेच्या लेखक–कवी यांची निवास–भोजनाची सारी व्यवस्था श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी, यांचेतर्फे करण्यात येणार आहे, तरी या संमेलनास हजर राहू इच्छिणाऱ्यांनी रिसिव्हर, श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी यांचेकडे त्वरित पत्रव्यवहार करून आपली जागा आरक्षित करावी म्हणजे व्यवस्था करणे ठीक पडेल.

● श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी, साईनिकेतन आंबेडकर पथ, दादर मुंबई १४ येथून यासाठी एक खास एस. टी. गाडी सोडण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी पन्नास जागा भरण्याची जरूरी आहे. एस. टी. भाडे प्रत्येकास द्यावे लागेल. श्रीसाईलीलेच्या लेखक–कवींना प्रथमाधिकार दिले जाईल. म्हणून एस. टी. मधील आपली जागा ७ जानेवारी १९७५ पर्यंत ताबडतोब नोंदवून आरक्षित करावी. म्हणजे पुढील व्यवस्था करणे सोयीचे सोपे व सुलभ जाईल. एस. टी. गाडी शुक्रवार दिनांक १७ जानेवारी रोजी दुपारी एक वाजता सोडली जाईल व ती शिर्डी येथे सुमारे रात्रौ आठ वाजता पोचेल. बसगाडी मुंबईहून नाशिक, सिन्नर मार्गे शिर्डीस जाईल.


| कार्यवाह :— | निमंत्रक, |
| --- | --- |
| (१) डॉ. श्री. दि. परचुरे<br>(२) श्री. सदानंद चेंदवणकर<br>का. संपादक श्रीसाईलीला | श्री. का. सी. पाठक,<br>रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान<br>शिर्डी, जि. अहमदनगर. |

लेखांक ५ वा

# ज्योतिषशास्त्राचा ओनामा

ले.–होरालंकार **शं. वा. देवधर**

## जन्मकुंडलीतील स्थाने




कुंडलीमध्ये एकंदर बारा स्थाने असतात. त्या स्थानांवरून खालील गोष्टी कळतात.

(१) प्रथमस्थान किंवा तनुस्थान किंवा जन्मलग्न या स्थानावरून शरीर, आरोग्य शारीरिक व्यंग, चेहरा वर्ण व स्वभाव यांचा विचार होतो. हे स्थान जन्मकुंडलीत फार महत्वाचे आहे.

( २ ) द्वितीय स्थान किंवा धनस्थान–या स्थानावरून सांपत्तिक स्थिती, वडिलार्जित धन, स्मरणशक्ती, वाणी, डावा नेत्र व कुटुंबसौख्य यांचा विचार होतो.

( ३ ) तृतीय स्थान किंवा सहज स्थान या स्थानावरुन धाकटी भावंडे, चुलत भावंडे, व्यासंग, लहान लहान प्रवास, पत्रव्यवहार व पराक्रम यांचा विचार होतो.

( ४ ) चतुर्थ स्थान किंवा सुहृद स्थान–या स्थानावरून आई, स्थावर इस्टेट, घरदार, कुटुंबाचा दर्जा व शेवटचे आयुष्य यांचा विचार होतो.

( ५ ) पंचमस्थान किंवा सुतस्थान–या स्थानावरून संतती, सट्टे, लॉटरी, विद्या बुद्धी वगैरेंचा विचार होतो.

( ६ ) षष्ठस्थान किंवा रिपुस्थान–या स्थानावरून शरीर प्रकृती, हाताखालचे नोकर, आहार व शत्रू यांचा विचार होतो.

(७) सप्तस्थान किंवा जाया स्थान–या स्थानावरून वैवाहिक सौख्य, पती–पत्नी, भागीदारीचे धंदे, कोर्ट, कचेऱ्या यांचा विचार होतो.

(८) अष्टम स्थान किंवा–मृत्यू स्थान–या स्थानावरून आयुष्य, स्त्रीधन, वारसा हक्क व मृत्यू कसा येईल या गोष्टींचे ज्ञान होते.

(९) नवम स्थान किंवा धर्मस्थान–या स्थानावरून परदेशगमन, लांबचे प्रवास, नाव लौकिक, अध्यात्मिक प्रगती, स्वप्ने यांचा विचार होतो.

(१०) दशमस्थान किंवा कर्मस्थान–या स्थानावरून नोकरी, धंदा, पितृसौख्य, सामाजिक दर्जा यांचा विचार होतो.

(११) एकादश स्थान किंवा आयस्थान–या स्थानावरून मित्र, लाभ, व मिळकत यांचा बोध होतो, म्हणून त्याला लाभस्थान म्हणतात.

(१२) द्वादश स्थान किंवा व्ययस्थान–या स्थानावरून खर्च, उधळेपणा, कोर्टाकडून शिक्षा, गुप्त शत्रू व इतर संकटे यांचा बोध होतो.

कुंडलीतील बारा स्थाने काय दाखवितात हे आपण पाहिले. आता एकादा ग्रह त्या स्थानामध्ये असता कोणते फळ निर्माण होईल याबद्दल विचार केला पाहिजे. उदा. गुरु हा शुभग्रह आहे. तो भरभराट, वाढ, विस्तार व उत्कर्ष दाखवितो. तो एखाद्याच्या धनस्थानात आहे तर त्याची सांपत्तिक स्थिति चांगली राहील. आर्थिक भरभराट होईल हे तो दर्शवितो. त्याउलट त्या धनस्थानात शनि आहे असे समजू, आणि शनि हा अडथळे आणणारा, अभाव दाखविणारा, मंद असा ग्रह आहे. तो धनस्थानात असल्यास त्याची आर्थिक स्थिती ओढगस्तीची राहील. अशा प्रकारे विशिष्ट स्थानात असलेल्या ग्रहावरून त्या स्थानाचे फल समजू शकते. प्रत्येक ग्रहाचे फल दर्शविणारे कोष्टक खाली दिले आहे.

( १ ) शनि — अभाव, लोप, व संकोच करणे.

( २ ) गुरु — उत्कर्ष, वाढ, सुबत्ता.

( ३ ) मंगळ — पराक्रम, उत्साह, तडफ, व भांडणतंटे.
( ४ ) रवि — कीर्ती, सन्मान, मोठेपणा, भपका.
( ५ ) शुक्र — सौंदर्य, प्रेम, आळस, चैन.
( ६ ) बुध—हुषारी, एकाग्रता, चंचलपणा.
( ७ ) चंद्र—कार्यक्षमता, फेरफार, उपयुक्तता, चंचलता.
( ८ ) हर्षल—अचानकपणा, बुद्धिमत्ता, संशोधन.
( ९ ) नेपच्यून—कल्पनाशक्ती, विचार शक्ती.

वरील गुणधर्म लक्षात घेऊन त्या स्थानाबद्दल कोणते फल मिळेल याचा अंदाज करता येतो. त्याचबरोबर तो ग्रह बलवान आहे की नाही हेही पाहणे आवश्यक आहे. त्याकरिता ग्रहांच्या उच्च राशी, स्वगृह राशी व बलहीन राशी कोणत्या ते समजले पाहिजे. खालील कोष्टकावरून त्याचे ज्ञान होईल.

| ग्रह | उच्चराशी | स्वगृह | बलहीनराशी |
|---|---|---|---|
| शनि | तूळ | मकर–कुंभ | मेष |
| गुरु | कर्क | धनु–मीन | मकर |
| मंगळ | मकर | मेष–वृश्चिक | कर्क |
| रवि | मेष | सिंह | तूळ |
| शुक्र | मीन | वृषभ–तूळ | कन्या |
| बुध | कन्या | कन्या–मिथून | मीन |
| चंद्र | वृषभ | कर्क | वृश्चिक |
| हर्षल | कुंभ | कुंभ | सिंह |
| नेपच्यून | मीन | मीन | कन्या |

या कोष्टकावरून त्या ग्रहाचे फल किती प्रमाणात मिळेल व कशाप्रकारे मिळेल ? यांचा अंदाज घेता येतो. आता आणखी एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे ती म्हणजे ग्रहांच्या दृष्टी.

( १ ) सर्व ग्रह आपल्या स्थानापासून सातव्या स्थानावर पूर्ण दृष्टीने पहातात.
( २ ) शनि आपल्या स्थानापासून ३–७–१० या स्थानावर पूर्ण दृष्टीने पहातो.
( ३ ) गुरु आपल्या स्थानापासून ५–७–९ या स्थानांवर संपूर्ण दृष्टीने पहातो.
( ४ ) मंगळ आपल्या स्थानापासून ४–७–८ या स्थानांवर पूर्ण दृष्टीने पहातो.

हे ग्रह या दृष्टीयोगामुळे त्या स्थानाच्या फलामध्ये फेरफार घडवून आणतात. समजा धनस्थानात गुरु आहे म्हणून सांपत्तिक भरभराट होईल असे तो दर्शवितो. परंतु

जर या गुरुवर शनीची दृष्टी असेल तर त्यांच्या सांपत्तिक प्रगतीमध्ये तो शनि अडथळा आणील पण या उलट शुक्राची दृष्टी असेल तर जास्त वेगाने प्रगती होईल.

वरील गोष्टी लक्षात घेऊन चाणाक्ष वाचकांनी फलांमध्ये कसकसे फेरफार होतील याचा जपून विचार करावा. अनुभवानेच चांगले निदान करता येईल.

फले वर्तविताना ग्रहांचे गुणधर्म ठाऊक असणे अत्यंत आवश्यक आहे. शुभग्रह असो अगर पापग्रह असो, तो कुंडलीतील कोणत्या तरी स्थानी विराजमान झालेला असणारच. अर्थात एकच ग्रह बारा स्थानांपैकी कोणत्याही स्थानी पडला असता काय फल देईल ते पाहावयाचे आहे. पुढील भागात प्रत्येक ग्रहाचे स्थानफल सामान्यपणे काय मिळेल ? एकटाच ग्रह त्या स्थानी काय फल देईल ? दुसऱ्या ग्रहांच्या युतीत अगर संबधात असल्यास त्या फलात काय फरक पडेल ? वगैरे गोष्टींचा आता आपण विचार करू.

ग्रहांचे द्वादशस्थानातील गुणधर्म आता पाहू.

## ग्रहांचे गुणधर्म

रवि :— सर्व ग्रहमालेमध्ये रवि हा प्रमुख आहे. सूर्य, आत्मा, जगतः तस्थुषः । असे म्हटलेले आहे. तो आपल्याला प्राणवायू देतो असे म्हटले आहे. जगातील सर्व शक्ती रविमुळेच निर्माण होते.

आता फलज्योतिष शास्त्रामध्ये रवीचे परिणाम काय होतात ते पाहू. शरीरातील रुधिराभिसरण क्रियेवर रवि परिणाम करतो. तो पित्याचा कारक आहे त्यामुळे पित्यासंबंधी विचार आपल्याला रविवरून कळतो. रविचे स्वगृह सिंह राशी, उच्च गृह मेष राशी व तूळ राशी रवीची नीच राशी समजली जाते.

मेष, सिंह, धनु या राशीत रवि बलवान असतो व कर्क, वृश्चिक, मीन या राशींमध्ये रवि साधारण फले देतो. आता यानंतर जन्मकुंडलीच्या प्रत्येक स्थानात रवि आला असता कोणती फले मिळतात ते क्रमशः पाहू.

( १ ) जन्मकुंडलीमध्ये लग्नी रवी असता मनुष्य सडपातळ, उंच, केस पिंगट, चेहरा रुंद, केस विरळ असतात. तो मनुष्य अभिमानी, गर्विष्ठ व स्वतःला मोठा समजणारा असतो. तो महत्वाकांक्षी व कर्तबगार असतो. त्याच्या अंगी धाडस हा गुण असतो. चिकित्सक व स्वार्थी स्वभावाचा असतो. निरनिराळ्या राशींमधे असलेला रवि निरनिराळे परिणाम करतो. मेषेचा रवि डोकेदुखी उत्पन्न करील. मिथुन, तूळ व कुंभ या राशींतील रवि बुद्धिमत्ता देतो. कर्क राशीतील रवि पराक्रम देतो.

( २ ) द्वितीय स्थानामध्ये रवि असता वडिलार्जित इस्टेट मिळत नाही. डोळ्यास अपायकारक होतो. पैशाचा खर्च बेदरकार होतो.

( ३ ) तृतीय स्थानामध्ये रवि असेल तर मनुष्य पराक्रमी असतो. मोठे होण्याची हाव असते. भावंडास मदत करतो. मोठेपणा व औदार्य असते. रवि व मंगळ

असता हट्टीपणा असतो. पण पराक्रमी असतो. शनि-रवि किंवा हर्षल-रवि बहिरेपणा उत्पन्न करतात.

(४) चतुर्थ स्थानी रवि असता जन्म चांगल्या कुळात झालेला असतो. वडिलांचा दर्जा चांगला असतो. आयुष्याच्या शेवटी भरभराट होते. महत्वाकांक्षा पूर्ण होतात. रवि-शुक्र युति असेल तर वाहनांचे सौख्य निश्चित मिळते. रवि-हर्षल योगामुळे जमीन व इस्टेट मिळू शकते. रवि पापग्रहाबरोबर असेल तर आयुष्याचा शेवटचा काळ क्लेश व कष्टदायक असतो.

(५) पंचम स्थानी रवि असता बुद्धिमत्ता चांगली असते. सिंह राशीमध्ये येथे गुरू असला तर विद्या व्यासंग व बुद्धिमत्तेचे तेज उत्तम असेल. मेष, सिंह, धनु या राशींमध्ये भाषा व साहित्य-शास्त्र यामध्ये प्रगती दाखविल. कर्क राशीत भाषा व गणित व वृषभ, कन्या व मकर राशीत इतर शास्त्रे यांकडे बुद्धी चालेल. संतती, या रविमुळे बुद्धिमान व कर्तबगार निपजते. मेष, सिंह व धनु राशीमध्ये अल्प संतती व कर्क, वृश्चिक, मीन राशीत पुष्कळ संतती होते. रवि-बुध सिंह राशीत असता पुत्र संततीच होते, निदान प्रथम पुत्र होतो. हा रवि सट्टे, शर्यती यांमध्ये यश देत नाही. मोठ्या लोकांच्या ओळखी होतात.

(६) षष्ठ स्थानी रवि असता आरोग्याला अनुकूल नसतो. तरी प्रतिकार करण्याची शक्ती चांगली असते. हा रवि नोकरीचे बाबतीत बढती व उन्नती करतो.

(७) सप्तम स्थानी रवि असता हा रवि पती सुखाला अनुकूल असतो. स्त्रियांना वैवाहिक सौख्य चांगले मिळते. मात्र तेथे पापग्रहाशी युती असता कामा नये. रवीबरोबर तेथे राहू, मंगळ, शनि असल्यास वैवाहिक जीवन बिघडते. रवि-शनिमुळे बिजवर मिळतो. रवि मंगळामुळे कलह निर्माण होतात. पुरुषाच्या दृष्टीने हा रवि मानी स्वभावाची स्त्री देतो. तिला पतीबद्दल आदर असतो. भागीदारी धंद्यात हा रवि फायदेशीर आहे.

(८) अष्टम स्थानी रवि असता स्त्रीधन प्राप्त होते. दीर्घायुष्य असत नाही. ५० ते ६० ही आयुर्मर्यादा असते. अष्टम स्थानी रवि-शनि, रवि-मंगळ असे वाईट योग असल्यास पितृसौख्य कमी मिळते व शेवटचे दिवस आपत्तीत जातात. अष्टम स्थानी रवि-चंद्र अल्पायुष्य देतात.

(९) नवम स्थानी रवि असता वृत्ती भाविक असते. स्वभाव दिलदार असतो. तीर्थयात्रा घडतात. परदेश यात्रा व परदेशात भाग्योदय हे या रविचे गुणधर्म आहेत.

रवि-शनि येथे असता दांभिकपणा धर्मवेडेपणा दिसून येतो. रवि-मंगळ हे देशाभिमानाचे द्योतक आहे.

(१०) दशम स्थानी रवि असता तो फार महत्वाचा आहे. येथे मेष, सिंह व धनु या राशींचा रवि फार उत्तम. असा मनुष्य कर्तृत्ववान निपजतो व मोठ्या पदावर

जातो. कर्क वृश्चिक मीन या राशीचे रवि समाजकार्य करणारे लोक दाखविते. येथील रवि पितृसुखाला चांगला असतो. फक्त रवि–शनि योग किंवा रवि–मंगळ, रवि–हर्षल, रवि–राहू हे योग नसतील तर वडिलांशी चांगले पटेल.

(११) एकादशस्थानी रवि असता मनुष्य स्वाभिमानी असतो. त्याची महत्वाकांक्षा प्रामाणिक असते. त्याला चांगले मित्र मिळतात. सरकारी नोकरीत बरचा दर्जा मिळतो. कर्क, वृश्चिक, मीन राशीत येथे रवि असता व्यसनी लोकांची संगत लागते.

(१२) द्वादश स्थानी रवि असता मनुष्य आपल्या कर्तबगारीने पुढे येतो. शास्त्रीय विषयाची त्याला आवड असते. पण शनि, मंगळ, हर्षल यांचा अशुभ योग असल्यास मात्र आयुष्य आपत्तीमध्ये जाईल.

श्रीसाईलीला

## फेब्रुवारी १९७५ अंकाची आकर्षणे

- साई भक्तांची श्रद्धास्थाने या लेखमालेत मोहितेबाबांचे वरळीचे श्रीसाई मंदिर.
- संत मेहेरबाबा यांच्या स्मृतीदिनानिमित्त खास लेख.
- भेटी–गाठी या सदरात सुविख्यात साहित्यिका प्रा. डॉ. चारुशिला गुप्ते यांची साईभक्ती.
- गुरुवर्य द. शं. टिपणीस यांनी दासगणूंच्या ३१ व्या अध्यायावर केलेली चर्चा.
- सौ. उषाताई मुळे यांचा ‘ प्रचिती ’ हा अनुभववजा छोटा लेख.
- होरालंकार देवधर यांच्या ज्योतिषविषयक लेखमालेचा शेवटचा लेखांक.
- “ साईबाबा व त्यांची कृपा ” हा ग्वाल्हेरच्या दिनकरराव सपकाळ यांचा लेख.
- श्री. र. श्री. पुजारी यांची साईनाथ ही चालू लेखमाला.

याशिवाय जयंत भिडे, दत्ताराम बारस्कर, शाम जुवळे, लक्ष्मीतनया, सौ. लीला देशमुख, श्रीमती विमलादेवी, श्रीराम आठवले इ. च्या भावमधुर कविता.

पृष्ठे ४८ ..................................किंमत अवघी ६० पैसे

# नामस्मरणातून गुरुप्रसाद

• श्री. प्रकाशभाई दोशी

मानवांची विचारांची धार फार वेगळी आहे. त्यांचे सर्व आचार विचार बाह्य जगाकडे लागलेले आहेत. दर दिवशी दर तासाला काही ना काही नवीन गोष्टी जन्माला येत असतात व त्या गोष्टी मिळविण्याची खटपट करीत असतो. मानवाचा मूळ स्वभावच असा आहे की तो सुखासाठी तांत्रिक युगाकडे धाव घेतो, परंतु तो कधी अंतरमनाचा विचार करीत नाही कशात खरे सुख आहे हे शोधण्याचा तो प्रयत्न करीत नाही. ते शोधण्यासाठी अंतरमनाचे चक्षू लागतात तशी प्रथन दृष्टी हवी असते व तसे आचार विचार असावे लागतात.

आज आपण प्रत्यक्ष बाह्य जगांनी रंगवलेली सजवलेली दूरचित्रवाणी मुंबई व इतर शहरातून पहात आहोत व त्या नकली दूरचित्रवाणीसमोर दोन ते तीन तास बसून आपल्या सुखाची आनंदाची नांदी लावण्याचा प्रयत्न करीत आहोत. परंतु हा आनंद क्षणीक मोलाचा असून, खरा आनंद, खरे सुख अंतरमनाच्या दूरचित्रवाणीमध्ये आहे. परंतु त्याचा विचार कोणी करीत नाही, किंवा ते काय आहे हे बहुजन लोकांना माहित देखील नाही.

जन हो, हा अंतर मनाचा दूरचित्रवाणी फार मोठा व शक्तिशाली आहे. हा प्राप्त करण्यासाठी फार फार कष्ट सोसावे लागतात. त्यासाठी अध्यात्माची जोड घ्यावी लागते. तो कोणालाही घेता येतो व कोणालाही पाहता येतो. ह्यासाठी बाह्य नकली रंगलेल्या नटलेल्या दूरचित्रवाणीप्रमाणे पैसे मोजावे लागत नाही. किंवा एरिअल बांधावी लागत नाही. ज्याला अंतरमनाचा दूरचित्रवाणी मिळाला आहे तो फार मोठा भाग्यवान होय. त्याला फक्त नकली चित्र दिसत नाही तर तो जमीन अस्मानापलीकडे जाऊन भूत, वर्तमान व भविष्यकाळ पाहू शकतो. त्याचे आकलन करू शकतो. त्याला काळ वेळ ह्यांचे बंधन नाही. फक्त अध्यात्माची बैठक लागते. ही प्राप्त होण्यासाठी त्याला सर्व भोवतालील परिस्थितीवर मनाचा ताबा ठेवावा लागतो. डोळ्यावर स्वच्छ व पवित्र किरणांचे आच्छादन लावावे लागते. तोंडावर मीटर ठेवावा लागतो. सर्वात मोठे म्हणजे गुरुकृपा असावी लागते.

ज्याना सर्व गोष्टी जमतात व गुरूचे मार्गदर्शन लाभते अशा लोकांना अंतर-मनाचा दूरचित्रवाणी पहाण्यास फारसे कष्ट सोसावे लागत नाहीत.

परंतु आजची परिस्थिती पहाता फारच थोड्या लोकांना हा दूरचित्रवाणी मिळाला आहे. हा मिळविण्याची धडपड तळमळ आज समाजात नाही. जो तो सर्व

ठिकाणी पैसे मोजतो व वस्तु विकत घेतो व आपले उरलेले आयुष्य गाडी मोटारींत घालवितो. परंतु झोपताना त्याला झोपेच्या आहारी जाता येत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे आजची प्रजा फार बाह्य जगाकडे धाव घेत आहे, ज्यांना खरोखर आपल्या संस्कृतीची, आपल्या परिस्थितीची परंपरेची, जाणीव आहे अशा ह्या लोकांची बहुजनसमाजात विटंबना केली जाते व काहींना गुरुकृपेचे मार्गदर्शन मिळत नाही.

जे कोणी गुरुकृपेशिवाय थांबले असतील व खरोखरच अंतरमनाची तळमळ असेल की गुरुकृपा लाभावी तर एकच स्थान आहे व ते म्हणजे माझे परमपूज्य सर्व-शक्तीमान गुरु 'श्री साईबाबा' होत. ह्यांचा जर आपण आश्रय घेतला तर आपण त्यांचेच झाले समजावे. ह्या गुरुची गणना King of God ह्या सदरात मोडते व म्हणूनच माझा चक्षू तुम्हाला नक्कीच मार्गदर्शन करील. येथे कोणाच्या मध्यस्थाची किंवा पैशाची जरूरी नाही. फक्त 'श्रद्धा' आणि 'सबुरी' ह्या दोन गोष्टी मुख्य आहेत. तसेच श्री बाबांच्या ब्रिदवाक्याप्रमाणे —

माझा जो जाहला कायावाचामनी । तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥ जे जे माझ्या चरणी आले आहेत, त्यांनी जी सुखाची गोडी चाखली आहे ती फार अवीट आहे, खूप मोठी व भव्य आहे. त्याची तुलना आपण कुठल्याही सुखाबरोबर करू शकणार नाही, हे निश्चित.

## नामस्मरण कसे करावे

एखादी शांत वेळ पाहून गुरूचे नामस्मरणास बसावे. डोळे नाकाच्या शेंड्यावर स्थिर करावेत, पाठ ताठ असावी, मान वाकलेली नसावी तर पाठीला सरळ रेषेत असावी. दोन मिनिट मन स्थिर करावे. धूप किंवा उदबत्ती पेटवावी. कारण ह्या वास इतका सुंद असतो की त्यामुळे मन प्रसन्न राहून, ह्याच्या धूराने जंतूविरहीत जागा निर्माण होते व परत एकदा गुरूचे पादुकांस हात लावून वर सांगितल्याप्रमाणे नामस्मरणास सुरवात करावी. नाकाच्या शेंड्यावर डोळे स्थिर झाल्यावर हळू हळू नामस्मरणासाठी बंद करावेत.

प्रथम प्रथम हे जमणार नाही तर ते कलेकलेने वाढवावे. वेळ लागेल. हरकत नाही. सर्व गोष्टी एकदम येत नसतात, तर श्रीबाबांच्या म्हणण्याप्रमाणे श्रद्धेसाठी सबूरी ठेवायची आहे. काही वेळेस नामस्मरणास बसल्यावर बाहेरील विचार डोक्यात येतील ते बाजूला सारा व साईबाबांची स्तुतीसुमने मनात आणा, पण नाम घ्यायचे विसरू नका. हे असे एक मिनीट ५ मिनीट व काही दिवसानी १ तास, दोन तास अशी मुदत वाढविल्यास आपोआप आपण ध्यानधारणेकडे झुकले म्हणायला हरकत नाही.

परंतु ध्यानाला बसायची जागा एक असावी, वेळ एक असावी व दिशाही एकच असावी व बसताना शक्यतोवर मांडी घालून बसावे, तसेच बसताना आसनावर

बसावे. देणे केले असताना कुठला देव तुम्हाला प्रसन्न होणार नाही !

## ध्यानाचे उपयोग

ध्यानामुळे शरीर प्रकृती सुधारते, अखंड नामस्मरण करण्याची गोडी निर्माण होते, सकाळी लवकर उठण्याची संवय लागते व गुरुकृपेचा जो प्रसाद मिळतो तो काय वर्णावा ! जे मागून मिळत नाही ते न मागता ह्या ध्यानातून मिळते. आणखीन काय हवे असते मनुष्यप्राण्यास ह्याच्यातच खरं सुख आहे समाधान आहे. फक्त गुरुचे कधीही विस्मरण होता कामा नये.

## अनुभव

ध्यानाला बसले असताना अनेक अनुभव येतील. कधीतरी झोप लागेल, कधी बाबा प्रत्यक्ष आपल्याशी बोलताना दिसतील, कधी विचार फक्त बाबांचे चालत असतील तर ते स्वप्नात येऊन दर्शन देतील किंवा स्वतः काहीतरी मागतील किंवा प्रत्यक्ष भेट देतील. ही हालती बोलती चित्रे हळू हळू वाढत जातील व आपण टेलिफोनवर जसे बोलतो तसेच परंतु वायरलेस प्रमाणे आपण बाबांशी बोलू शकू ही शेवटची पायरी आहे.

हे सर्व करत असताना कधी कंटाळा हा शब्द मनास शिवता कामा नये. असे झाले म्हणजे तुमच्याकडे श्रद्धा नाही व सबूरीही नाही असे होईल.

आपण फक्त त्यांच्या चरणाचे दास बनायचे. त्यांना काय हवे ते देतील, ते सर्व बघून घेतील इतकी अढळ श्रद्धा असावी मग ते आकाश फाडूनसुद्धा देतील.

आपल्याला काही तरी मिळावे (पैसा व इ.) ह्यासाठी नामस्मरण करावे ? नाही हे सर्व त्यांच्या चरणावर अर्पण केले म्हणजे गुरु म्हणजेच आपला माता पिता, रक्षण करता, पालन करता व दाताही तोच व कुठेही तो कमी पडू देणार नाही. जे सर्व काही करतो ते तोच करतो, असे धरून चालावे.

ध्यानाला बसले असताना समजा आग लागली किंवा आणखीन काही संकटे आली तरीही ' ॐ श्री साई शरणम् मम ' हा जप अखंड चालू ठेवावा, आपले स्थान सोडू नये व ह्यातच खरी कसोटी आहे व हीच खरी साईलीला आहे व त्या संकटाची किंवा आगीची झळ यत्किंचितही तुम्हाला लागणार नाही. तुमचे नेहमीच चांगले होईल वाईट होणार नाही. वाईट जरी मनात आले तरी ते अंतःकरणाला पटणार नाही व तुम्ही त्यांच्याविषयी चांगले विचार मनात आणाल. नामस्मरणाची कला फार मोठी आहे हे पटवून दिले आहे, कोणाला किती पटते व पटत नाही हे श्रद्धेवर व प्रत्येकाच्या आचार विचारावर अवलंबून राहील. तेव्हा प्रत्येकाने अध्यात्माची जोड लावा म्हणजे पहा जीवन कसे उज्वलीत होईल.

---

# श्रीसाईभक्ताची चार स्वप्ने

**स्वप्न : १**

मी पुण्याच्या एका ज्योतिषाला जोडकार्ड पाठविले. त्यात म्हटले की मला माझे भविष्य जाणून घ्यायचे आहे. त्या पत्राप्रमाणे ज्योतिषी माझ्या घरी आला व मला सांगू लागला, मी तुम्हाला एक उत्तम मंत्र सांगणार आहे. मी त्याला म्हटले, माझा मंत्र ॐ श्रीसाईराम आहे. तेव्हा तो म्हणतो, "अहो साईराम साईराम काय घेऊन बसलात." परंतु मी त्याला सांगितले, मी तुमचा मंत्र घेणार नाही व माझा मंत्र सोडणार नाही. तेव्हा घरातून माझी आई म्हणते, अरे, ते जर एवढा चांगला मंत्र देत आहेत तर तू तो का घेत नाहीस ? तेव्हा मी निक्षून सांगितले, त्यांचा मंत्र कितीही श्रेष्ठ असला तरी तो मंत्र मी घेणार नाही व माझा मंत्र सोडणार नाही. तेव्हा ज्योतिषी म्हणाला, तुम्ही ह्या गोष्टीवर जरा विचार करा. मी जरा वेळाने पुन्हा तुम्हाला भेटेन. असे म्हणून ज्योतिषी निघून गेला व मी जागा झालो.

तात्पर्य : बाबांनी मंत्राबद्दल माझी कसोटी घेतली व केवळ त्यांच्याच कृपेमुळे कसोटीस उतरलो.

**स्वप्न २**

मी शिरडीला गेलो व समाधी मंदीरापाशी उभा होतो. तेव्हा श्रीसाईबाबा प्रत्यक्ष समाधीवर फिरताना पाहिले. मी त्यांचेजवळ गेलो व त्यांना नमस्कार केला. तेव्हा बाबांनी जवळच एक मोठे उदीपात्र होते त्यातून उदी घेतली व कागदात गुंडाळून मला दिली व मला म्हणाले, ही पुडी तुझेजवळ अखंड असू दे. तेव्हापासून मी अखंड उदीची पुडी माझेजवळ ठेवत आहे.

**स्वप्न ३**

मी शिरडीला गेलो आहे. तेथे फक्त खंडोबाचेच देऊळ दिसत आहे. तेव्हा मी तेथे बसलेल्या पुजाऱ्याला विचारले, आमचे बाबा कोठे आहेत ? तेव्हा खंडोबाच्या मागे वरून एकदम द्वारकामाईमधला बाबांचा बसलेला फोटो आला व त्या फोटोखाली लिहिले होते "ह्यांचे जो नाव घेईल त्याचे कल्याण होईल."

**स्वप्न ४**

१९६० मार्च महिन्यातील स्वप्न :

"माझे घरात श्री साईबाबांची दगडावर बसलेली मूर्ती आहे. तेथे बाजूला पुजारी बसले आहेत. मी ऑफिसला जायला निघणार एवढ्यात त्या पुजाऱ्याने मला बोलावले व मला सुंठवडा व तूप असा एकत्र प्रसाद दिला. मग मी कामावर जाण्यास निघालो तेव्हा परत पुजाऱ्याने मला बोलाविले व सांगितले, "अरे श्रीसाईबाबा तुझे गुरु आहेत, तेच तुझे कल्याण करतील. तू दुसरीकडे कुठेही जाऊ नकोस" आणि मी जागा झालो. तेव्हापासून मी श्री साईबाबांना गुरु केले.

**• माधवराव गोरे**

# श्री साईनाथ

(श्रीसद्गुरु साईमहाराज ललितचरित्र)

● र. श्री. पुजारी, पुणे

## (२७) शृंगाराऐवजी भक्तिरसाची माथवणी दासगणूंच्या काव्यात यासाठीच बाबांनी करविली.

आईला आपल्या तान्ह्या लेकराच्या भावना सहजपणे कळतात. त्याच्या मनाच्या इच्छा, आकांक्षा, हर्ष ती सहजपणे जाणू शकते. निसर्गाचेही असेच असू शकेल काय? आपल्या तान्ह्याच्या मनाचे लळे माय आनंदाने पुरविते, त्याप्रमाणे मानवी मनाचे सर्व लळे निसर्ग पुरवीत असेल काय?

श्रीराम हे लहानापासून थोरांपर्यंत सर्वांना प्रिय असणारे दैवत. या दैवताचे गुणगान अडाणी आयाबायांपासून प्रतिभावान् महाकवीपर्यंत सर्वांनी केले. हा श्रीराम आपल्यातीलच एक मानून त्याचे चरित्र मोठ्या प्रेमाने आज अनेक शतके गायिले. त्या श्रीरामाचा जन्मोत्सव साजरा करताना सर्वांच्याच अंतःकरणास प्रेमाचे भरते यावे यात नवल ते काय!

निसर्गही यावेळी मानवी भावनांशी समरस झाला आहे. वृक्षावृक्षावर लाल, कोवळे नाजूक नवपल्लव डुलत आहेत. आंब्याआंब्यावर कोकिळकूजन सुरू आहे. स्वच्छ, निरभ्र नील आकाशाचा मांडव श्रीरामाच्या जन्मोत्सवानिमित्त निसर्गाने घातला आहे.

अण्णासाहेब दाभोळकर फिरून परत आले तेव्हा त्यांना भासले की सबंध शिरडी गावच रामजन्मोत्सवाच्या आनंदाने आज भारले आहे.

जिकडे पहावे तिकडे केळीचे खुंट दिसत आहेत. आंब्याचे डहाळे दिसत आहेत. गुंगोळ्या दिसत आहेत. नवीन पोषाख करून आनंदी मनाने स्त्रिया-पुरुष-मुले वावरत आहेत.

आज दुपारी बारा वाजता रामजन्मोत्सव.

या जन्मोत्सवासाठी किती दूरदूरचे भक्त आले आहेत! किती तऱ्हांनी आपली सेवा येथे सादर करीत आहेत!

कोणाला चित्रकला अवगत आहे. कोणाला गायनी-कळा अवगत आहे. कोणी कीर्तन-भजन-निरूपण यात प्रवीण आहे. कोणाची कसबी बोटे सतार-सारंगी-दिलरुबा यांच्यावरून हळुवारपणे फिरताना नादब्रह्म निर्माण करणारी आहेत.

ज्या श्रीरामाने हा सुंदर देह दिला, मन दिले, बुद्धी दिली, विद्या आणि कला दिली, त्याच्या सेवेकारणी यातील काही अंश तरी लागो अशी सर्वांच्या मनाची तळमळ. तिच्या पूर्तीसाठी सर्वांचे येथे येणे.

ज्याला विद्या, कला, कसब यातील काहीच लाभले नाही, ते मोठ्या प्रेमाने शरीर–कष्टाची कामे करीत आहेत. पाणी भरणे, लाकडे फोडणे, पाने मांडणे, वाढणे, उष्टी काढणे, भांडी घासणे ही कामे ते हसत–खेळत करीत आहेत. त्या विश्रामधाम श्रीरामाला ही सेवा संकीर्तनाहूनही प्रिय आहे, हे मनोमन त्यांनी जाणले आहे.

भिक्षेसाठी बाबा आता गावात गेले आहेत.

काका महाजनी वाड्यात येऊन, तेवढ्या गर्दीतही बाबांच्या लीलांची बैठक जमवून आपण साजऱ्या केलेल्या पहिल्या रामजन्मोत्सवाची हकिगत खुलवून सांगत आहेत—

" माणसाचा स्वभावच मोठा हौशी. उत्सवप्रिय. अजाण मुलांनी भातुकलीचा खेळ मांडून त्यात बाहुलीचे लग्न करताना वरमाई, भटजी, ताशेवाले इत्यादी भूमिका हौसेने कराव्यात तसा !

उत्सवाची मूळ कल्पना गोपाळराव गुंडांची. पण ती उचलून धरली माधवराव, तात्याबा इत्यादी ग्रामस्थांनी. ते म्हणाले, " जत्रा काय, उरूस काय किंवा मेळावा काय—तुम्ही काहीही नाव द्या. अर्थ तोच ! पण खरी अडचण अशी की आपणाला सरकारची लेखी परवानगी काढावी लागणार ! ती कशी मिळणार ? "

तात्याबा आणि माधवराव डोक्याला हात लावून सचिंत होऊन बसले !

गोपाळराव गुंड सरकार दरबारी पोहलेले. ते म्हणाले, " त्यात काय विशेष आहे ? मी एक अर्ज लिहून देतो. त्याच्यावर ग्रामस्थांच्या सह्या घेऊन अर्ज वर कलेक्टरसाहेबांकडे पाठविला की झाले ! आपले काम संपले. मग पुढचे सर्व बाबा पाहून घेतील. "

पण बाबांचा स्वभाव दूरदर्शी पित्यासारखा ! मुलाने मागितले आणि ते त्याला सहजासहजी मिळाले, असे कधीच व्हायचे नाही !

साहजिकच कामात अडथळा आला. ' तशी परवानगी देता येत नाही ' असे वरून उत्तर आले.

नगरला जाऊन कलेक्टर कचेरीत समक्ष चौकशी केली तेव्हा कळले की बाबांचे भक्त म्हणविणारे गावातीलच एक लेखणीबहाद्दर कुलकर्णी या कामी आडवे पडलेले आहेत ! त्यांनी आपल्या डोक्यानेच एक शकल लढविली आहे ! ती म्हणजे " या गावात तशी जत्रा भरविण्याची परवानगी दिल्यास दोन जमातीत जातीय तेढ माजून दंगेधोपे होण्याचीही शक्यता आहे ! "

अर्थात पुन्हा अर्ज-विनंत्या करणे आले! सर्व ग्रामस्थांच्या सह्या घेऊन "या गावातील सर्व जमातीत अत्यंत सलोखा आहे. तो आणखी वाढावा यासाठीच हा प्रयत्न आहे" अशी वकिली करणे आले. एवढे झाल्यानंतर सरकारी पाहाणी घेऊन गेली. पूर्ण खात्री पटल्यानंतर मगच काही अटींवर परवानगी मिळाली!

हा चैत्र महिना सर्वांनाच सोयीचा. शेतीची कामेही तशी काही नाहीत. शहरातील लोकानाही पाऊसपाणी, थंडीवारा, नदीचा पूर असे अडथळे नाहीत. या दिवसात हवापाणी वगैरेही उत्तम. साहजिकच उरूस सुरू झाला.

उरूस म्हटला की तेथे कुस्त्यांचा फड आला. बैलगाड्यांच्या शर्यती आल्या. मेवामिठाईची, कापडचोपडाची दुकाने आली. फिरते पाळणे आले. हौस, मौज, खरेदी, विक्री सर्व काही आले.

उरसाला मशीद, दर्गा, पीर, फकीर अशा गोष्टी लागतात. बाबांच्या ठिकाणी हे सर्वच. त्यांचे वास्तव्यही मशिदीतच. मशिदीतील ताजा, गुडघे टेकून फकिरानी स्वच्छ, मोकळ्या आवाजात पढलेली कलमे, 'अल्ला हो अकबर' ची दिलेली बांग — हे सर्व पाहून मुसल्मानानी म्हणावे, "साक्षात महमद पैगंबरसाहेब बाबांच्या रूपाने पुन्हा अवतरले आहेत!"

पण हिंदूना दिसावे ते दृश्य वेगळेच.

एक मंदिर. तेथे भिंतींवर 'श्रीराम जय राम जयजय राम' असे लिहिलेले. ॐ ची आकृती मोठ्या रेखीवपणे वर रेखलेला. श्रीरामाचा एक सुंदर फोटो तेथे लावलेला. समया, उदबत्त्या, घंटा, शंख, धुनी यांच्या मध्ये रामनामाची धून अखंड सुरू असलेली. त्या वातावरणात तो कमलनयन, अजानुबाहू मर्यादापुरुषोत्तम श्रीराम बाबांच्या रूपाने प्रसन्न चित्ताने बसलेला आहे! आनंदाने मधून मधून मान डोलवीत आहे!

उरूस चैत्रात. साधारणपणे रामनवमीच्या आसपास. ही संधी साधून उरसाच्या आधीच एक दिवस मी शिरडीत येई. बाबांची पूजा, आरती, चावडीची मिरवणूक यातील आनंद दसरा-दिवाळीप्रमाणे लुटे!

असाच एका उरसासाठी मी आलो. साठ्यांच्या वाड्यात उतरलो. बाबा लेंडीवरून परत आले तसा पूजेचे साहित्य घेऊन मशिदीकडे निघालो. तोच कोणीशी मला हाक मारली, "काका! काकासाहेब! जरा थांबा."

मी वळून मागे पाहिले तर बाबांचे एक परम भक्त कृष्ण जागेश्वर भीष्म! भीष्मच मशिदीत निघालेल्या मला थांबवीत होते.

भीष्म एका खांबाशी उभे! काही एक विचार त्यांच्या मनात दीर्घकाळ घोळत असावा. पण तो विचार बोलावा की नाही? असे त्यांना वाटत असावे. कारण खांब सोडून माझ्याजवळ ते आले तेही द्विधा मनस्थितीतच!

नंतर खासगीत बोलावे तसे, पण आनंदनिर्भर स्वराने ते मला म्हणाले, "काका, उद्या रामनवमी. माझ्या मनात एक सुंदर विचार येतो आहे. तो असा की उद्या आपण मशिदीत रामजन्माचा उत्सव साजरा केला तर! तुम्हाला कसा काय वाटतो हा विचार? अनायासेच आपणास उत्सवाची ही संधी मिळत आहे म्हणून विचारतो ..."

भीष्मांच्या मनाची उत्कंठा, त्यांचा उत्साह, आतुरता ध्यानी घेऊन मी म्हणालो, "विचार खरोखरच फार चांगला आहे. पण बाबांचा होकार मात्र मिळाला पाहिजे तो मिळाला की कार्याला काय उशीर! तथापि एक अडचण उरणारच. ती म्हणजे कीर्तनासाठी हरिदासाची! येथे खेडेगावी आयत्या वेळी हरिदास कोठून मिळणार?"

भीष्म तात्काळ म्हणाले, "एवढेच ना? मग त्यात अडचण कसली? मी कीर्तनाला उभा राहीन. तुम्ही पेटीचा स्वर धरा. राधाकृष्णाआई सुंठवडा करून द्यायला आहेतच. पाच मिनिटात त्या आपणास सुंठवडा तयार करून देतील. मग आता उशीर का? चला! बाबांकडे असेच जाऊ! शुभस्य शीघ्रं!"

मशिदीत जाऊन बाबांची पूजा करण्यास मी कोठे सुरुवात करतो तर बाबांचाच प्रश्न! "काय काका, काय चालले होते वाड्यात?"

गोंधळून काय बोलावे हे मला सुचेना. तोपर्यंत तोच प्रश्न पुन्हा भीष्मांना! "काय बुवा, काय म्हणता? बोला!"

बाबांकडून अशी पृच्छा झाल्यानंतर भीत भीतच भीष्माचा मनोदय मी बाबांच्या कानी घातला. तेव्हा बाबा म्हणाले, "चांगले काम आहे. करा की!"

पण बाबांनी संमती दिली तरी मनात धाकधुक कायमची. सभामंडपाच्या खांबासारखे व्हायला नको! म्हणून दुसरे दिवशी बाबा लेंडीवर गेले आहेत असे पाहिले आणि सभामंडपात पाळणा बांधूनसुद्धा टाकला!

येथपर्यंत सर्व ठीक जमले. श्रोतेसुद्धा अगदी वेळेवर कीर्तनासाठी हजर झाले. कीर्तन सुरू झाले.

भीष्म उभे राहून गुरुस्तवन करीत आहेत. पेटीवर बसून मी सूर धरला आहे. राधाकृष्णाआई तिकडे सुंठवडा करीत आहेत.

तोच निरोप आला, "काका, तुम्हाला बाबा बोलावीत आहेत." बाबांचा निरोप घेऊन येणाऱ्या व्यक्तीचे एवढे शब्द कानाने ऐकले मात्र—माझ्या छातीत धस्स झाले. पेटीच्या भात्यावरचा हात सुटला. मनाशी म्हणालो, "जे गृहीत धरले होते तेच आता घडणार! बाबांचा रुद्रावतार आता प्रकट होणार! त्या प्रलयकारी क्षोभात आता हे केविलवाणे कीर्तन राहाते की जाते कोण जाणे!"

निमुटपणे मी पेटीवरून उठलो. हातापायातील बळ गेले होते तरी कसाबसा पायऱ्या चढून वर गेलो. बाबांसमोर हात जोडून, घसा भीतीने कोरडा पडला होता तरी बोललो. म्हणालो, "मी आलो आहे."

मला पाहून बाबा तीव्रपणे बोलले. म्हणाले, "कोणी बांधला आहे तो पाळणा? कशासाठी बांधला आहे तेथं?"

दोन्ही हात जोडून आमचा उद्देश, योजना वगैरे संबंधीची माहिती मी त्यांना दिली. त्यांच्या आज्ञेनेच जन्मोत्सव साजरा करीत आहो हे सांगितले. हे ऐकून घेऊन, शांत होऊन बाबा म्हणाले, "अरे, कोणी तरी जाऊन दोन हार घेऊन या रे."

धावत जाऊन एका क्षणात कोणी एकाने दोन सुंदर हार आणले.

त्यातील एक हार माझ्या गळ्यात स्वतःच्या हाताने घालून बाबा म्हणाले, 'तो दुसरा हार बुवांच्या गळ्यात घाला. हरिकथा करणाऱ्याच्या गळ्यात हार घालावा. याशिवाय हरिकथा कसली!"

बाबांच्या एवढ्या उद्गारांनी टांगणीस लागलेला सर्वांचाच जीव खाली पडला. सुटकेचा एक निश्वास सर्वांनी टाकला. मनाशी म्हणाले, "आता कीर्तन निर्विघ्नपणे पार पडेल – पडलेच."

भीष्म आधीच बहुश्रुत. पोथ्यापुराणातील अनेक कथा, उपकथा, आख्याने त्यांच्या जिभेच्या शेंड्यावर. तशात श्री बाबानी दिलेला हार गळ्यात. त्यांच्या वाणीस स्फुरण होण्यास कितीसा अवकाश! भक्तिरसाची गंगा दुथडी वाहू लागली. भाविक श्रोते त्या गंगौघात पोहू लागले.

अशा रीतीने रामजन्माचे कीर्तन होऊन रामजन्म झाला.

सर्वत्र लालेलाल असा गुलालच गुलाल दिसू लागला.

बाबांचा सबंध चेहराच नव्हे तर त्यांच्या डोळ्यांच्या पापण्याही गुलालाने माखल्या. हे पाहून सभामंडपातील भक्तमंडळी म्हणू लागली, "कौसल्येच्या मंदिरातील ते श्रीराम असेच, श्रीबाबांसारखेच दिसले असतील नाही!"

पण एवढ्यात काय झाले न कळे. बाबांना कोप झाला. अकस्मात भडकले. नारसिंहावतार धारण केला. शिव्याशापांची लाखोली सुरू झाली. उठून, त्या पाळण्याकडे आवेशाने जाऊन, हात करून म्हणू लागले, "सोडा! सोडा! तो पाळणा आधी! कोणी बांधला तो तेथं? कोणाच्या हुकुमाने?"

बाबांचे शब्द ऐकून राधाकृष्णाआईच्या छातीत धाकधुक सुरू झाली. मनात म्हणू लागल्या, "लोकांकडून मागून आणलेला तो पाळणा! तो आता कसचा धड राहणार! बाबांच्या रागाच्या तडाख्यात सापडला की त्याचे तुकडे होण्यास उशीर नाही!"

पाळणा सोडण्यासाठी थरथर कापतच मी पुढे झालो. हे पाहून बाबांचा राग आणखीनच भडकला. धावून माझ्या अंगावर आले. मग कोठले पाळणा सोडणे आणि काय! एखाद्या खांबासारखा मी जागच्या जागी खिळून उभा राहिलो.

बाबांकडे पाहिले तर त्यांच्या रागाचा पारा उतरलेला दिसला.

मग दुपारी पुन्हा मी विचारले तेव्हा म्हणाले, "एवढ्यातच कसचा पाळणा सोडतोस ! अजून आपणास लागेल की ! "

याप्रमाणे तो दिवस उलटला. मग दुसरे दिवशी गोपाळकाल्याचे कीर्तन झाले. ते झाल्यानंतर बाबा म्हणाले, " आता पाळणा सोड. "

रामजन्माचा हा रोमांचकारी इतिहास सांगून काका महाजनी म्हणाले, " जी गोष्ट एकदा अग्निदिव्यातून पार पडली तिला पुन्हा अग्निदिव्य नाही. साहजिकच रामजन्माचा सोहळा प्रतिवर्षी सुरू झाला.

मग पुढील वर्षी भीष्म नव्हते. म्हणून बिऱ्हाड सिद्धकवठ्याच्या बाळाबुवा सातारकरांना कीर्तनासाठी आणविले. तिसऱ्या वर्षी तर रामाने त्यांना शिरडीस ओढून आणले ! म्हणाला, " तुझ्या गावी चालू साली महामारीची साथ आहे ना ? तर चल शिरडीस. कर तेथे माझी सेवा. "

बाळाबुवा 'अर्वाचीन तुका.' त्यांनी येथे येऊन रामाची सेवा केली. निरपेक्षपणे केली. आणि शिरडीनिवासी हा श्रीराम प्रसन्न झाला. म्हणाला, " हे घे पाचशे रुपये, तुझी बिदागी. "

कवठ्याची त्यांची जी पाच वर्षांची बिदागी, ती बाबांनी त्यांना एकाच वर्षात देऊन टाकली !

मग पुढे एक दिवस दासगणू आले. तेव्हा सॉलिसिटर दीक्षित, नानासाहेब चांदोरकर, मी असे सर्वांनी बसून विचार केला की यापुढे रामनवमीचा उत्सव दासगणूंना द्यावा. कारण नवमीचे आख्यान त्यांनी स्वतः रचले. वेळप्रसंगी उपयोगी पडावे म्हणून ते माझ्या स्वाधीन केले. नामवंत कीर्तनकार म्हणून बाहेर लौकिक मिळविला. अशा परिस्थितीत आपल्या घरचा मनुष्य, बाबांचा प्रिय भक्त सोडून कीर्तनकारासाठी आम्ही असे बाहेर वणवण का फिरावे ?

आमचा विचार बाबांच्या कानावर घातला तेव्हा बाबांनी आनंदाने मान डोलविली. म्हणाले, " ठीक आहे ! "

पोलिस खात्यातून ओढून काढून, शृंगाराऐवजी भक्तिरसाची माथवणी दासगणूंच्या कवनात करवून, बाबांनी त्यांना हरिकीर्तनासाठी गावोगावी पाठविले, संतचरित्रे लिहिण्याची आज्ञा केली ती काय उगाच !

" ठीक आहे " हे बाबांचे संमतीदर्शक उद्गार ऐकून क्षणभर आम्हा सर्वांनाच वाटले की या उत्सवासाठी दासगणूंची निवड बाबांनी फार पूर्वीच केली आहे. ती आम्हांपैकी कोणासही माहीत नव्हती. फार काय, खुद्द दासगणूंनाही तिचा या क्षणापर्यंत पत्ता नव्हता !

## ३८. रामा ! मी येथे पोचावे म्हणूनच तुमची सर्व योजना

सकाळचे अकरा वाजून गेले आहेत. उन्हाच्या झळा मारत आहेत. रस्त्यावरून अनवाणी चालावे तर पाय भाजत आहेत. डोक्यावरून काही न घेता जावे तर डोक्यास उन्हाचे चटके बसत आहेत. पावलापावलागणिक घामाच्या धारा अंगातून निथळत आहेत.

तरीही माणसांचा उत्साह ओसंडत आहे. मशिदीच्या दिशेने स्त्रिया-पुरुष-मुले यांची पावले धावत आहेत.

मशिदीतील वातावरण यावेळी अत्यंत शांत आहे.

दहा-पंधरा स्त्रिया-पुरुष एवढी मंडळी तेथे असूनही बोलण्याचा आवाज नाही. गोंगाट नाही. जणू मशिदीत यावेळी कोणी माणसे आहेत की नाहीत !

बाबा यावेळी आपल्या नेहमीच्या जागी शांतपणे बसले आहेत. नित्य प्रज्वलित असलेल्या आपल्या धुनीकडे पाहात आहेत. जणू येथे घडणाऱ्या एकूण एक गोष्टींची साक्षी आज अनेक वर्षे ही धुनीमाई झाली आहे !

ही धुनीमाई म्हणजे गंगातीरावरील कोणा ऋषींचे अनादी यज्ञकुंड ! या पवित्र अग्नीला आज अनेक शतके असंख्य ऋषिमुनींनी हविर्द्रव्याच्या आहुती मंत्रोक्त उच्चारानी दिल्या असतील. अखिल विश्वावर येणाऱ्या अरिष्टांच्या नाशनार्थ आणि विश्वधर्मांच्या रक्षणार्थ हे होमहवन एका पिढीने दुसऱ्या पिढीच्या हाती सोपविले असेल. मानवांसह सर्व जीवमात्र पूर्ण सुखी होवोत, पूर्ण निश्चिंत होवोत, सर्वांचे कल्याण होवो, दुःख म्हणून कुणाही जीवाच्या वाट्यास यत्किंचितही न येवो-हीच सर्वांत शेवटची प्रार्थना त्यांनी पसायदान मागण्यासाठी केली असेल. ॐ शान्तिः ! शान्तिः !! शान्तिः !!! हेच त्यांचे शेवटचे उद्गार असतील.

हेच कार्य येथे बसून बाबा मूकपणें करीत आहेत. जे अभद्र, अमंगल, दुःखद, पापमूलक त्याला अग्निस्पर्शाने जणू पुनर्जन्म घडवीत आहेत. पापाचे पुनर्जन्मातील शुद्ध स्वरूप म्हणजे हे चिताभस्म. ही विभूती. ही उदी !

चिताभस्माची जी विभूती श्रीशंकरानी सर्वांगावर प्रेमाने धारण केली तीच आज ' उदी ' होऊन या विश्वेश्वराच्या हाताने भक्तांच्या कपाळी विराजमान होत आहे. सर्व दुःखे, संकटे, अरिष्टे, क्लेश यांचे मदन-दहन करण्याचे सामर्थ्य या एका चिमुटभर उदीत आहे.

बाबा असे आत्मचिंतनात मग्न आहेत. बापूसाहेब जोग मशिदीच्या दर्शनीभागी ठेवलेल्या श्रीरामाच्या फोटोला भक्तांकडून येणारे नवनवीन हार घालीत आहेत. चंदनी उदबत्त्या लावीत आहेत. जणू बाबांप्रमाणेच तसबिरीतील हा श्रीराम भक्ताना कंटाळणारा नाही. पत्र-पुष्प-फल-तोय असे जो जो भक्त जे जे प्रेमाने आणील ते ते स्वीकारणारा तो आहे.

सुवासिनी, लेकुरवाळ्या स्त्रिया यांच्या वात्सल्यास तर तर सीमाच नाही. जिथे जिथे जन्मोत्सव, तिथे तिथे वात्सल्याची ही गंगा दुथडी भरून वाहात आहे. ‘ कुणी गोविंद घ्या, कोणी गोपाळ घ्या ’ म्हणून त्या टीचभर तान्हुल्याचे कौतुक करीत आहे.

श्रीराम त्या सर्वांना प्राणाहूनही प्रिय. सद्गुणांची ही सगुण, गोजिरी मूर्ती. या मूर्तीचा जन्मोत्सव आज किती शतके चालत आला आहे ! तरी त्यातील भक्ती, प्रेम कौतुक रतीभरही कमी झाले नाही. रामासाठी प्रतिवर्षी नवे रेशमी कुंचडे शिवताना, त्याला गोंडे आणि मोती लावताना स्त्रियांचे मन आनंदाने भरून आले नाही, असे झाले नाही.

आजही तेच प्रेम, तीच भक्ती, तेच कौतुक मशिदीतील स्त्रियांच्या डोळ्यातून ओसंडत आहे. केवळ स्त्रियाच नव्हेत तर मोठमोठे कामदार–अमल्दार पुरुषसुद्धा, रामजन्माचा सोहळा खराखुरा मानून देहमनाने त्यात रंगून गेले आहेत.

भोजनघरातील पहाटेपासून चाललेला प्रसादाचा स्वयंपाक आता पुरा झाला आहे. त्या सर्व पदार्थांवर झाकणे ठेवून, दाराना कड्याकुलपे लावून तेथील मंडळी आता मशिदीत आली आहेत. मशीद, सभामंडप आणि सभोवतालची जागा आता माणसानी गच्च भरून गेली आहे. मुंगीस शिरकाव मिळण्यासही वाव नाही इतकी दाटी होऊनही सर्व माणसे कशी शांतपणे बसली आहेत. कीर्तनकार श्री गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे ऊर्फ संतकवी दासगणू यांच्या वाटेकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

नव्याने उत्सवासाठी आलेल्या माणसांच्या डोळ्यासमोर कीर्तनकार दासगणू यांची काल्पनिक मूर्ती उभी आहे.

कानात टपोऱ्या मोत्यांची भिकबाळी. कपाळी सुंदर केशरी गंध, मस्तकावर झगमगत्या सोनेरी झिरमिळ्यांची लालचुटुक रेशमी पगडी. बोटात पिवळ्याधमक सोन्याची भारी सलकडी......

कीर्तनकार म्हणून कीर्तिमान असलेला हा पुरुष आता करवतकाठी धोतरे नेसत असेल. शुभ्र, लांब अंगरखा त्यांच्या गौरवर्ण, सुडौल देहावर शोभत असेल. करवतकाठी, भरजरी उपरण्याची ऐटदार घडी एखाद्या पिढीजात कीर्तनकाराप्रमाणे विद्वत्ता, व्यासंग आणि हरिभक्ती यांचा सुरेख संगम त्यांच्या सहज होणाऱ्या प्रत्येक हालचालीतून शब्दातून, कृतीतून घडवीत असेल...

— कल्पना आणि वास्तव यात कधी कधी केवढे अंतर ! केवढी तफावत ! ही तफावत सहन न होऊन मनाची होणारी केवढी वंचना–फसवणूक !

दासगणू तेथेच मशिदीत आहेत. पाठमोरे बसले आहेत. काही कामात मग्न आहेत.

कीर्तनाची वेळ होताच ते उठून उभे राहिले. बाबांसमोर येऊन बाबांच्या चरणांवर त्यांनी मस्तक ठेवले. म्हणाले, “ बाबा, मी कथेसाठी निघालो. मला आशीर्वाद द्या. ”

बाबानी त्यांच्या मस्तकावर हात ठेवला. पाठीवरुन हात फिरविला. म्हणाले, “ जा. कथेची वेळ झाली. ”

कमरेला पंचेवजा धोतर. खांद्यावरुन उघड्या अंगावर रुळणारे जाडसे यज्ञोपवीत. त्याच्या आश्रयाने खांद्यावर विसावलेले, असावे म्हणून ठेवलेले एक साधे, दाभणकाठी उपरणे. गळ्यात पंढरीची माळ. त्याला आणखी काय हवे ? एक हस्तक, दुसरे मस्तक ! दोन्ही हात जोडले; माथा चरणी टेवला की प्रभू प्रसन्न !

हस्तांमागील अंतःकरण; मस्तकामागील मन ! या दोन्हीखेरीज त्या जगन्नायकाच्या चरणी अर्पण करावे असे तिसरे आपणाजवळ काय आहे ? ही हस्तकमळे आणि हे श्रीफळ त्याच्या चरणांशी पोचताच तो नवकोटनारायण पाहील तो केवळ भाव ! शुद्ध भाव !

दासगणू बैठकीवर येऊन उभे राहिले. मशिदीतील श्रीरामाच्या त्या तसबिरीकडे डोळे भरुन पाहिले. दोन्ही हात जोडले. माथा नमवून तसबिरीतील श्रीरामाच्या चरणी मनोमन टेकला. अष्ट सात्त्विक भावांमुळे कंप पावणारे ओठ अलग होऊन म्हणाले, “ रामा ! तुमच्या सेवेसाठी आज पुन्हा तुमच्या चरणी आलो. या गणूला, तुमच्या दासाला तुमची वेडीवाकुडी, होईल तशी सेवा घडू द्या. ती गोड मानून घ्या. ”

— चुलत्यांच्या घरी मेलेले अन्न खाऊन दिवस कंठण्यापेक्षा स्वतःच्या मनगटाच्या जोरावर मिळेल ती अर्धीचतकोर मीठभाकर सुखाची, म्हणून तडकाफडकी घरातून बाहेर पडून पोलिसात भरती झालेला मी एक अविचारी मुलगा ! तमासगिरीच्या फडात शिरून त्यांना गणगोत मानणारा वाया गेलेला मी एक आचारहीन ब्राह्मण ! अशा मुलाचे मन जाणून अनाथरक्षक असे तुम्ही माझ्या नित्य पाठीशी राहिला. माझे सांगाती होऊन, माझे बोट धरून याच जगातील स्वर्ग आणि नरक यांचे दर्शन तुम्ही मला स्वच्छपणे घडविले.

श्रीगोंदे, जामखेड, खर्डा, नगर आणि नेवासे या पाच ठिकाणी अकरा वर्षे पोलिसखात्यातील नरक उघड्या डोळ्यांनी मी पाहिला. पण त्या नरकाच्या शेजारीच सत्संगाचा स्वर्ग मला लाभला हो रामा ! तुमची माझ्यावरील केवढी कृपा !

माझ्या पोलिसी नोकरीचा प्रारंभ श्रीगोंद्यास व्हावा यामागील तुमचा हेतूही आज ध्यानी येत आहे.

दत्त, पांडुरंग, लक्ष्मीनारायण, सूर्यनारायण, सिद्धेश्वर, श्री शंकर अशी येथे प्राचीन देवांची किती मंदिरे ! संतकवी शेखमहंमद, गोधडेबुवा, प्रल्हादराज महापुरुष अशा किती संतांचे वास्तव्य या स्थानी झाले ! मालोजींनी ठेवलेली ठेव श्रीशिवाजी महाराजांना प्रामाणिकपणे परत करणारे सावकार शेषाप्पा नाईक पुढे याच स्थानी राहिले ! अशा पवित्र स्थानी श्रीसद्गुरु वामनशास्त्री यांनी येऊन मला गुरुपदेश देऊन कृतार्थ करावे या परते अन्य भाग्य कोणते !

गुरुपदेशामुळे अंतरंगात रुजलेल्या सूक्ष्म बीजाला पहिला अंकुर फुटला तो जामखेडास. तेथे आयुष्यातील पहिले कीर्तन मी केले.

एका उत्सवप्रसंगी निमंत्रित हरिदास येऊ शकले नाहीत. त्यामुळे उत्सवसमारंभ कीर्तनाशिवायच पार पाडावा लागला. या गोष्टीचा उद्वेग मनास होऊन मामलेदार शेटफळकर मला म्हणाले, " गणपतराव ! अरे, लावण्या-पोवाड्यात तू आपल्या बुद्धीचा अपव्यय करतोस, त्याऐवजी जर काही आख्याने बसविली असतीस तर तुझ्या काव्यशक्तीचे खरे चीज झाले असते...पण नव्हेच ते ! तुम्हाला होळीच्या उत्सवाचे मानकरी होण्यातच भूषण वाटते ! "

माझ्या स्वाभिमानी मनाचा स्फुल्लिंग जणू या मर्मभेदी शब्दांनी पुन्हा फुलविला. कारण त्यानंतर पुढच्याच एकादशीच्या कीर्तनाची जबाबदारी मी आव्हानपूर्वक उचलली. शाळामास्तर, पोस्टमास्तर किंवा कचेरीतील एखादा कारकून या मारूनमुटकून कीर्तनकार केलेल्या मणसाइतकीच विद्वता माझ्यातही आहे हे जणू सिद्ध करायला मी निघालो !

या ईर्षेपोटी संत दामाजीचे आख्यान मी स्वतंत्रपणे रचले. लावण्या म्हणणाऱ्या माझ्या साथीदारांकडून ते चांगले पाठ करवून घेतले. मग पोलीसातील माझे सहकारी हवालदार हयातखाँ सरदारखाँ यांना दाढी उतरायला लावली. रुमाल, उपरणे असा हिंदू वेष त्यांना देऊन, कपाळास सुंदर गंध लावून त्यांना साथीस मागे उभे केले. ज्ञानेश्वर-तुकाराम-रामदास यांची काव्यरचना जिभेच्या शेंड्यावर असलेले, माझ्या शब्दाखातर कोणतेही अचाट साहस करायला तयार असलेले हे माझे प्रिय मित्र माझ्या लावण्यांऐवजी माझ्या कीर्तनातील पदे माझ्या मागे उभे राहून तितक्याच खड्या, पल्लेदार, सुरेल आवाजाने गाऊ लागले !

जवळ जवळ दोन तास लक्षपूर्वक आमचे कीर्तन ऐकल्यानंतर टर उडविण्यास आलेली मंडळीच म्हणू लागली, " हा गणपतराव दिसतो किंवा वाटतो तसा नाही. हा काही वेगळाच मनुष्य असला पाहिजे. "

ईर्षेतून निर्माण झालेले हे पहिले कीर्तन माझ्या सर्व आयुष्याचा पटच बदलून टाकील याची रामा ! मला त्यावेळी काय कल्पना !

जी गोष्ट त्या कीर्तनामुळे पुढे घडून आली, तीच गोष्ट लोणी नावाच्या गावातील गुप्तहेरीमुळे घडून आली.

तेथे तर मी एका साधूचा वेष धारण केला. अंगावर रामनामी चढविली. सकाळी राममंदिराची झाडलोट, पूजा केली. संध्याकाळी दासबोध, ज्ञानेश्वरी वाचली. रात्री भजन करून मगच निद्रा केली.

रामा ! एका गुप्तहेराला अशा रीतीने जवळ करुन, त्याच्याकडून ही सेवा त्या आडगावी माझ्याकडून का करवून घेतलीस बरे ?

ओढ्यावर जाऊन रानकण्हेरीची तांबडी-लाल फुले आणवून त्यावेळी तुम्हासाठी मी माळा केल्या. रुद्र, पवमानाची आवर्तने करुन अभिषेक केला. स्वयंपाक करुन नित्यनेमाने तुम्हास नैवेद्य समर्पण केला. दुपारी, तुम्हीच श्रीविष्णू या भावनेने विष्णुसहस्रनामाचे बारा पाठ तुमच्या चरणाशी म्हटले... हे सर्व माझ्यासारख्या पातक्याच्या हातून करवून घेण्यात रामा ! तुमची काय योजना होती बरे ? मी येथे येऊन पोचावे हीच ना ? दुसरी कोणती ?

मरणामुळेच जीवनाला जीवनपण येते. त्या लोणी गावी तर मी साक्षात मृत्यूचे दर्शन घेतले. दारू ठासलेली तोड्याची बंदूक माझ्या छातीवर रोखून त्या कान्ह्या भिल्लाने मला सवाल केला, " बोल ! खरा कोण आहेस तू ? तुझे नाव मी सांगतो. तुझे नाव गणेश दत्तात्रेय सहस्रबुद्धे ! तुझा बक्कल नंबर ७२७ ! बोल, खरे आहे की नाही हे ? "

मनुष्यहत्त्या हा तर त्या कान्ह्याच्या हातचा मळ ! एक नव्हे, दोन नव्हे, कित्येक माणसे त्याने बघता बघता अमानुषपणे खतम केलेली. माझ्या आधीच्या दोघा गुप्तहेराना त्याने नुकतेच यमसदनाला पाठविलेले. त्यातील मलकप्पा नागप्पा या खंडोबाच्या वाघ्याच्या वेषाने फिरत असलेल्या शिपायाला तर त्याने फरशी कुऱ्हाडीने सरपणाप्रमाणे तोडलेले.

अशा त्या मूर्तिमंत यमाच्या तावडीत मी सापडलो असताना रामा ! त्या हृदयहीन कान्ह्याच्या मनात माझ्याविषयी दयाबुद्धी कोणी निर्माण केली ? गाभाऱ्याकडे धाव घेऊन तुमच्या पायास घट्ट मिठी मारली, तेव्हा मार्कंडेयास श्रीशंकरानी अभय देऊन यमपाशातून मुक्त केले त्याप्रमाणे तुम्हाविना मला कोणी सोडविले ?

मृत्यूच्या पाशातून मला तुम्ही त्यावेळी सोडविले ते जणू एका अटीवर ! ती अट म्हणजे " तुझा अपमृत्यू टळला. पुनर्जन्म झाला. या पुनर्जन्मात तरी तुझे आयुष्य भगवत्सेवेकारणी लाव. " हो !

तरीही रामा ! मी पातक्याने डोळे उघडले नाहीत. फौजदारी मिळेल या आशेवर सद्गुरूंच्या आज्ञेचा अवमान केला. त्यांच्या प्रेमळ आज्ञेकडे दुर्लक्ष केले. झोपी जात असलेल्या मला, सद्गुरूंनी संकटे निर्माण करुन पुनः पुन्हा जाग आणली. मला जागता केला. जणू म्हणाले, " गणू ! नको नोकरी ही मला पोलिसाची ! बहु प्रष्टवी कष्टवी चित्त साची, मला त्यातूनी सत्वरी सोडवावे । रमानायका चित्ति माझ्या वसावे ।। असे करुणाष्टक सकाळ-संध्याकाळ किंबहुना त्रिकाळ डोळ्यात पाणी आणून तूच म्हणत असतोस ना ? मग आता विलंब का ? ती अपमानाची नोकरी सोड आणि ही रामाची मानाची नोकरी धर. "

रामा ! तुमची नोकरी मनाने मी धरली. बाबांच्या इच्छेप्रमाणे गावोगावी जाऊन संतचरित्रांची सामुग्री जुळवू लागलो. ती पडताळून पद्यबद्ध करू लागलो, आणि या सेवेत धन-संपत्ती विपाप्रमाणे वाटू लागली. हा देह जगविण्यास दोन वाग जाडेभरडे अन्न आणि एक वस्त्र माझा पांडुरंग मला कोठेही देईल असे म्हणू लागलो.

या माझ्या वैराग्याची सत्वपरीक्षा पाहाण्यासाठीच की काय, श्रीसद्गुरु वामनशास्त्री यांनी आपल्या मृत्युपत्रान्वये आपली सर्व इस्टेट मला देऊन टाकली !

पण तुमची कृपा अशी अमोघ की, त्या इस्टेटीतील एका कवडीलाही माझा स्पर्श घडला नाही. ती सर्व इस्टेट कायदेशीरदृष्ट्या माझी असूनही गुरुपत्नींच्या चरणी मी ती जशीच्या तशी अर्पण केली. म्हणालो, "मातोश्री, या जोखमीतून मला मुक्त करा. आपली इस्टेट आपण परत घ्या. मात्र सद्गुरुंचा मानसपुत्र म्हणून त्यांची एक प्रिय वस्तू मला द्या—माझ्याजवळ असू द्या. ती म्हणजे सद्गुरुंच्या नित्यपूजेतील ती श्री विठ्ठलमूर्ती !

देवा ! तो माझा प्रिय विठ्ठल काय, श्री शंकर काय, श्री विष्णू किंवा श्री कृष्ण काय—सर्व तुम्हीच ! मूर्ती जरी भिन्न भिन्न, तरी भाव तोच. प्रेम तेच. भक्ती तीच !

तो भाव, ती भक्ती, ते प्रेम माझ्या मनात रुजण्यासही किती काळ लागला ! केवढे कष्ट पडले ! किती वादावादी मी नास्तिकाने त्यावेळी केली ! पण सद्गुरू श्री बाबांनी एका शब्दानेही कधी मला झिडकारले नाही. उलट परोपरीने माझ्या उनाड, ओढाळ मनाची समजूत काढली. मी घेतलेल्या हट्टाकडेसुद्धा माउलीच्या प्रेमळ दृष्टीने पाहिले.

सहस्त्रबुद्ध्यांच्या नाणावलेल्या कुळात जन्माला येऊनही पाहिले हयातखाँसारखे मुसलमान, रामा आणि पांडू यांचा बाप अंबू गोंधळी, तुळशीराम दळवी यांच्यासारखे तमासगीर यांच्यात मी राहिलो; मुंज्याच्या पारावर डफ तुणतुण्याच्या झंकारात त्यांच्या हृदयीची सुखदुःखे जाणून घेतली; त्यांच्या कुटुंबातीलच एक होऊन त्यांच्या फाटक्या, दुष्काळी प्रपंचाला प्रसंगी थोडाफार हातभारही लावला; हे माझे गरिबांवरील प्रेम पाहूनच का रामा ! सद्गुरू श्री बाबा विरघळले ? माझ्या अनंत अपराधाची क्षमा या एका गुणाकडे पाहूनच का त्यांनी केली ?

या आणखी अशाच कित्येक आठवणींमुळे दासगणूंच्या डोळ्यातून अश्रूंचा प्रवाह सुरू झाला. सद्गुरू श्रीवामनशास्त्री यांच्या आज्ञेने घातलेल्या पंढरीच्या तुळशीमाळेतील मणीन मणी छातीवर अश्रूंनी चिंब झाला. सद्गुरू श्री बाबा आणि श्रीवामनशास्त्री हा भेदही मनातून नाहीसा होऊन सद्गुरू म्हणजेच देव, आणि देव

म्हणजेच श्री सद्गुरु हा भाव मनाशी स्थिर झाला. सर्वत्र एकच तो हास्यवदन, आजानुबाहू, चापपाणि श्रीराम भरून राहिलेला त्यांना दिसू लागला.

दासगणूनी नकळत दोन्ही हात जोडले. मस्तकाशी धरले. त्या अनंतरूपी श्रीरामाला त्यांनी नमस्कार केला.

कीर्तनाच्या साथीदारानी कीर्तनाच्या प्रारंभाचा हा क्षण आतुरतेने टिपला. तबला, पेटी, सारंगी यांचा एक कोमल स्वर हवेमधून वर चढून श्रीरामाच्या शुभ चरणांपर्यंत पोचला. त्याच्या मागोमाग दासगणूंची भक्तिप्रेमाने गहिवरलेली वाणी गुरुस्तवन करू लागली—

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः
गुरु साक्षात् परब्रह्मः तस्मै श्रीगुरवेनमः

# मानवी जीवनाचा दशहरी रथ

मानवी जीवन हा अतीव सुंदर असा दहा घोड्यांचा रथ आहे. या रथाचा स्वामी आहे जीवात्मा. तसेच या रथाचा सारथी आहे संकल्प-विकल्पात्मक मन. लगाम आहे शुद्ध बुद्धी. पंच ज्ञानेंद्रिये व पंच कर्मेंद्रिये हे आहेत स्वभावतःच विषयांकडे धाव घेणार घोडे. जो विवेकी मनुष्य जीवात्म्याचे व मनाचे ऐक्य साधून लगाम आपल्या हातात ठेवून आपला रथ हाकलतो, तो मनुष्य सायुज्य मुक्तीच्या अंतिम ध्येयाला पोचतो.

बाकीच्यांबद्दल काय बोलावे ? बोलायचेच झाले तर असे म्हणता येईल.
" आला आला प्राणी जन्मासी आला, गेला गेला बापुडा व्यर्थ गेला "

— बाळकृष्ण सदाशिव धामणकर

### साताऱ्याच्या परम साईभक्त

# ताईसाहेब खडके साईचरणी विलीन

सातारा येथे गेली कित्येक वर्षांपासून स्थायिक असलेल्या श्रीमती जानकीबाई रामकृष्ण उर्फ ताई खडके या ४ डिसेंबर ७४ रोजी श्रीसाईचरणी विलीन झाल्या. निधन समयी त्यांचे वय ९४ वर्षांचे होते. आपल्या पूर्वायुष्यातील बराचसा काळ श्रीमती ताई यांनी साक्षात् श्रीसाईबाबांच्या सहवासात शिर्डीस घालविलेला होता. श्रीबाबा हयात असताना त्यांनी बाबांची पूजा–आरती केलेली आहे. आपली जीवनज्योत मालवेपर्यंत त्यांनी साईनाम सोडले नाही. उतारवयात आपल्या बिछायतीजवळच त्यांनी श्रीसाई तसबिर बसवून घेतली होती. ताईंनी श्रीबाबांच्या सहवासात घालविलेले क्षण वेचण्यासाठी आम्ही मुद्दाम साताराला डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात जाणार होतो, त्या संबंधात योग्य पत्रव्यवहारही झाला होता व आम्ही तिकडे येणार म्हणून श्रीमती ताईंनाही खूप आनंद झाला होता. परंतु दैवगती विचित्र व त्यामुळे तो योग आला नाही हेच खरे.

श्रीमती ताईंना पाच पुत्र व दोन कन्या. त्यांचे एक चिरंजीव श्री. आत्माराम अकाऊंटंट जनरलच्या कचेरीतून सुपरिंटेंडंट पदावरुन सेवानिवृत्त झालेले आहेत. दुसरे श्री. शांताराम मुंबईस चिक्का लिमिटेड कंपनीत नोकरीस आहेत. तिसरे श्री. दामोदर उर्फ साईनाथ हे असिस्टंट डायरेक्टर, स्पेशल ब्युरो कॅबिनेट सेक्रेटरीएट, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया या मोठ्या पोलीसी हुद्यावर आहेत. तर चौथे श्री. भाऊसाहेब सातारमधील एक विख्यात डॉक्टर म्हणून ओळखले जातात. श्रीमती ताईंच्या दोन्ही कन्यका सौ. प्रमिला वैद्य व सौ. कृष्णा दावलभक्त या अनुक्रमे खडकी व पुणे येथे रहातात. श्रीमती ताईंच्यामागे असंख्य मित्रपरिवार, हितचिंतक व आप्तनातलग–नातू, नाती यांचा गोतावळा आहे.

आम्ही श्री. खडके कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. परमेश्वर मृतात्म्यास सद्गती देवो ही साईचरणी प्रार्थना.

—कार्यकारी संपादक


## श्रीसाईनाथ रोजनिशी

**शके १८९७ (१९७५-७६)**

येत्या गुढीपाडव्याच्या दिवशी इंग्रजी व मराठीत थाटात प्रकाशित होणार.

- श्री साईबाबांचे शिलाखंडावर अधिष्ठित तिरंगी मनोहर छायाचित्र
- श्री बाबांचे संक्षिप्त चरित्र. श्री साईबाबा संस्थान शिर्डीत काय काय पहाल. श्री. बाबांचे समकालीन संत व त्यांची माहिती.
- श्री साईसमाजांचे संपूर्ण पत्ते. श्री बाबांचे बोल ' शिर्डीतील प्रमुख उत्सव, बाबांच्या आरत्या. समाधिमंदिर, द्वारकामाई, गुरुपादुकास्थान इ. ची आर्ट पेपरवरील छायाचित्रे. आकर्षक वेष्टन. संग्राह्य माहिती. संग्राह्य रोजनिशी.

## " देवा ! "

देवा आता तार
अथवा तूं मार
तुझ्याविना नाही
दुसरा आधार
काम क्रोध लोभ
कवटाळले उरी
विसरलो तुज
क्षमा कर हरी
अवघेचि भोग
साकळले फार
तूंच तया आता
आवर आवर !
लवकर लवकर
विनवितो हरी
तुज वारंवार
जोडोनिया कर !

## " पांडुरंग पांडुरंग ! "

विश्वाचे हे नाना रंग
रात्र आणि दिवसांत
रेखितसे नियमित
पांडुरंग, पांडुरंग !
निसर्गाचे ना ढंग
दाखितसे रोज किती
चराचरीं विश्वंभर
पांडुरंग ! पांडुरंग !
जनी, मीरा सख्‌ दंग
भजनांत अगदी गुंग
संताचा तो सदासंग
पांडुरंग, पांडुरंग,

— विजय द. हजारे

## श्रीसाईस्वप्न

निंबाखाली मुलगा बसला
नाव तयाचे नच ठावे
तहान नाही भूक कोठली ?
जप करितो जीवेभावे ॥ १ ॥

झाडावरुनी उतरुनि खारी
हात जोडुनि बसताती
डोळे मिटले या बाळाचे
दुनियेची कोणास क्षिती ॥ २ ॥

गोरागोमटा असा देखणा
राजा जैसा शोभतसे !
मातापितरे कोण असावी ?
का रानी एकला बसे ॥ ३ ॥

निंब भासला मज औदुंबर
श्री दत्ताची मूर्ति दिसे !
वात्सल्याचा फुटे उमाळा
नीर नयनिंचे रोखु कसे ॥ ४ ॥

नाव न याते, गाव कळेना
धर्म न अपुला सांगे !
सदा हसतमुख सुणसुर्णीत हा
यतिसम बालवयी वागे ! ॥ ५ ॥

राजापुरची गंगा जणु की
शिर्डीमध्ये झुळझुळली
न कळे कुठली या गावाची
पुण्याई सुफला झाली ॥ ६ ॥

कुठल्या रूपे देव येतसे
अपुल्या दारी कळे कुणा ?
भाविक वदती गहिवरताती
पुसती डोळे पुन्हा पुन्हा ॥ ७ ॥

— श्रीराम आठवले

# नामाची शिदोरी

प्रभाती उठोनी साईनाम घ्यावे
पुरुषोत्तमासी आळवावे! ...... १
अंगणात राही उभा कल्पतरू
सदोदित स्मरा मनोभावे! ...... २
रोग आणि भोग सरती सदाचे
म्हणोनीया वाचे तया गावे! ...... ३
नामाची शिदोरी शिळी ना कधीही
पुरे जन्मभरी ओळखावे! ...... ४

— विनायक पाठक

# चिदानंद हे साई

चिदानंद हे साई समर्थ आले शिर्डीत —
शिर्डीक्षेत्र केले पावन या भू जगतात —
शिर्डी शिर्डी म्हणता बाबा उभे दिसतात
त्या साई समर्थ साई चरणी माझा दंडवत ( १ )
शिर्डी ग्रामी जाता-दिसते मंदिर शिखर ।
भक्ताचे मन आनंदून पाहे वर वर ॥
मंदिरी जाता बाबा दिसते बसले समोर।
भक्त जन समर्थास घालती दंडवत ॥ २ ॥
मंदिर तो सुगंध घुमतो चहू बाजूला।
भक्त ते विसरती आपल्या मोह पाशाला।
सेवक करिती समाधीस हा अभिषेक ॥
साखर, पेढे, नारळ, ठेवती हे अनेक ( ३ )

अभंग

भक्त घालती प्रदक्षणा-उदी लावूनिया माथा ।
मुखी साईनाथ रे म्हणा—वाचूनिया गाथा ॥
धूप आरतीची प्रचीती—मनीची इच्छा पूरती ॥
भक्तीभावे घेता आरती-सर्व व्यथा खचित जाती ( ४ )
द्वारकामाईत विश्रांती भक्त तेथेच रमती ।
अग्नि तो सेवत पाहती बाबा तेथेच असती ॥
भक्त प्रसाद उदी घेती—बाबाकडे टक लाविती ॥
अंतरी इच्छा प्रगटती—बाबा समोर उभे राहती ( ५ )

— रामचंद्र माधवराव आडकर

# भूवरी आले साईनाथ

उघडली भक्तिची पेठ । भूवरी आले साईनाथ । उघडली ॥ ध्रु० ॥
या भूमिचे पुण्य अगणित । झाले शिरडी गांव क्षेत्र ॥ भूवरी आले ॥ १ ॥
निंबतरुतळीं प्रगट जहाली । श्रीसाईची मूर्ति सावळी ।
रूप मनोहर तेज आगळे । पाहूनी जन झाले विस्मित ॥ उघडली ॥ २ ॥
मशीदीमध्यें अखंड वसती । धुनी सन्मुख सदैव बसती ॥
ध्यानमग्न हे अखंड वदती । " अल्ला मालिक " । उघडली ॥ ३ ॥
या देवाची अघटित करणी । पणत्यांमध्यें ओतुनी पाणी ॥
तेला वांचूनी दिवे जाळिले । मशिदींत सारी रात । उघडली ॥ ४ ॥
भक्त भोवती श्रीसाईंच्या । नित्यसोहळा भाव भक्तिचा ।
दरबार खुला शिरडीश्वराचा । राव असो वा रंक ।
कृपादृष्टिने पाही सकला । अनाथाचा नाथ । उघडली ॥ ५ ॥

—सौ. सुशीलाबाई हजारे

# आता इच्छित मनोरथ पुरवावे

साई माऊली माते भगवती
जयस्तुते जयस्तुते
आता इच्छित मनोरथ पुरवावे
आता इच्छित मनोरथ पुरवावे
भाव अंतरीचे आज मनी फुलले
ते सकल ही आज तुम्हा दारी येऊनी ठाकले
आता इच्छित मनोरथ पुरवावे
भक्ताचे मनोरथ जाणूनी आशीर्वाद द्यावे
साईमाऊली आशीर्वाद द्यावे
अल्लड अवखळ अनाथ नादान ही तुझी बालके
हाती धरून भव पार करावे
साईमाऊली तुझ्या पदी ठेवून तव घ्यावे
आता इच्छित मनोरथ पुरवावे
तुझ्या दर्शने आज मी पावन झाले
बहुतांची आस तुम्ही आज पुरवावे
भोळा भाव अंतरीचा तुम्हीच जाणता
सकळ सौभाग्य वरदायी व्हावे
धरणी वरती अमृतवृष्टी करूनी सकळा सुखवावे
आता इच्छित मनोरथ पुरवावे

— सौ. कलावती व. चव्हाण

# शिरडी–वृत्त माहे नोव्हेंबर सन १९७४

या महिन्यात दिवाळीची सुट्टी झाली, कॉलेजाना असल्यामुळे सहली व श्री साईबाबांचे दर्शनासाठी साई भक्तांची गर्दी बरीच होती.

**दिवाळी :** सालाबादप्रमाणे श्रींचे समाधिमंदिरात श्रीलक्ष्मीपूजन कार्यक्रम माननीय श्री. का. सी. पाठक साहेब कोर्ट रिसीव्हर यांचे शुभहस्ते झाले. नंदादीप, पणत्या, मेणबत्त्या वगैरे दिव्यांची व विजेचे दिव्यांची रोषणाई करण्यात आली होती. यावेळी काही साई भक्तांनी शोभेची दारु उडवून, मुलांचे कार्यक्रमात भाग घेऊन आनंद लुटला. अशा थाटात धूपारती होऊन कार्यक्रम पार पडला.

**कार्तिक एकादशी :** महाएकादशी निमित्त सालाबादप्रमाणे कीर्तन, श्रींचे पालखीची रात्री गावातून मिरवणूक, गारुड–भारुड इत्यादि कार्यक्रम झाले.

**तुळशी विवाह :** श्रींचे द्वारकामाईत सालाबादप्रमाणे तुलसी विवाह कार्यक्रम झाला. संस्थान कर्मचारी व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांना प्रसाद वाटण्यात आला. काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन :** ( १ ) संस्थान गवई, काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली. ( २ ) श्रीमती कृष्णाबाई येवलेकर, सातारा. ( ३ ) ह. भ. प. तुकाराम बुवा परदेशी, शिर्डी. ( ४ ) ह. भ. प. कल्याणनाथ महाराज, संगमनेर. ( ५ ) ह. भ. प. बाळकृष्ण म. म्हसकर, जि. ठाणे. ( ६ ) श्री. डी. वाय. तिकोणे, ता. पारनेर. ( ७ ) ह. भ. प. लक्ष्मण बुवा वाघचौरे. शिरडी.

**प्रवचन :** ह. भ. प. जगन्नाथ विठ्ठल वाघचौरे, शिरडी यांचे प्रवचन झाले.

**भजन, गायन नृत्य, वादन वगैरे** } ( १ ) श्री. के. टी. टिक्कू मुंबई ( २ ) गुरुदेव सेवामंडळ एदलाबाद ( ३ ) श्री गुरु भजन संस्था पुणे ( ४ ) सुदर्शन नृत्यकला मंदिर कु. शोभा घाडगे गोरेगाव मुंबई. ( ५ ) श्री. बी. आर. अमेंबल, मुंबई.

**सत्कार :—** संत प. पू. सद्गुरु श्री. गजानन महाराज उर्फ अण्णासाहेब पट्टेकर महाराज ठाणे, हे गुरुवार दि. २१–११–७४ रोजी श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी शिरडीस आले. त्यावेळी माननीय कोर्ट रिसीव्हर श्री. का. सी. पाठक साहेब यांनी शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला.

**माननीयांच्या भेटी :—** ( १ ) मा. श्री. आडारकर, अध्यक्ष स्टेट ट्रान्सपोर्ट महाराष्ट्र राज्य. ( २ ) मा. श्री. मोहिते, राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य. ( ३ ) मा. श्री. कपूर, रिटायर्ड सुप्रीम कोर्ट जज्ज व २२ अधिकारी. ( ४ ) मा. श्री. पारेख, सिटी सिव्हिल कोर्ट जज्ज मुंबई. ( ५ ) मा. श्री. वारवकर, डी. एस. पी. अ. नगर

**हवा पाणी :—** शिरडी येथील हवा पाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |
| ४½" × ५½" | रु. ०-३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. डी. डी. नेरॉय यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | २५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | " " | १-२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | " | २२.८६ × ३३.०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | " " | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४

मुद्रक : **पांडुरंग मोरे,** मोगे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई-३१.
संपादक व प्रकाशक : **श्री का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.